



RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

आज गौराईचे आगमन

https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२०५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.१० सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६




## भाजपचा अजित पवारांना २५ जागांवर मैत्रीपूर्ण लढतींचा प्रस्ताव? रवी राणांचा खळबळजनक दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

महायुतीत सारे काही आलबेल नाही असे एकंदरीत राजकीय चित्र दिसत आहे. भाजपा, शिवसेनेचे नेते उघडपणे अजित पवार गटाला टार्गेट करत आहेत. लोकसभेला अजित पवारांना सोबत घेतल्यानेच भाजपला फटका बसल्याचे आरोपही झालेले आहेत. अशातच विधानसभेला अजित पवार महायुतीतून बाहेर पडतील अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे. रोहित पवार याचे दावे करत असतानाच महायुतीचा भाग असलेल्या रवी राणा यांनी देखील तसेच संकेत देणारे वक्तव्य केले आहे.



अजित पवार गट तिसऱ्या आघाडीतून किंवा वेगळे लढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. हा दिल्लीतूनच आदेश आला आहे, असाही दावा विरोधकांकडून केला जात आहे. भाजपला अजित पवारांना सोबतघेऊन लढल्याचा फटका बसायला नको म्हणून ही खेळी केली जात असल्याचा दावा रोहित पवार यांनी केला होता. आता राणांनी बडनेरा मतदारसंघामध्ये आपली महायुतीमधून उमेदवारी जाहीर करताना मोठे वक्तव्य केले आहे.

ज्या ठिकाणी तिन्ही पक्षाचे उमेदवार मजबूत आहेत त्या ठिकाणी उमेदवाराला थांबवल्याने पक्षाचे मोठे नुक्सान होते. भाजपने ज्या पण २५ ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतीचा जो प्रस्ताव दिला आहे तो अजित पवारांनी सुद्धा स्वीकारायला हवा. अजित पवार यांच्या उमेदवारांमध्ये जेवढा दम आहे तेवढे उमेदवार त्यांनी निवडणुकीमध्ये उतरवावेत. भाजपचे जे मजबूत उमेदवार आहेत ते उतरतील. दमदार उमेदवाराला थांबवणे म्हणजे महायुतीचे नुकसान आहे, असे राणा म्हणाले. भाजपने ज्या पंचवीस जागा मागितल्या आहेत त्यामध्ये अमरावती शहर मतदारसंघही आहे. बडनेरा मतदारसंघामध्ये महायुतीचा मी उमेदवार आहे. मला देवेंद्र फडणवीस यांनी हिरवी झेंडी दिली आहे. मी युवा स्वाभिमान पक्षाकडून लढणार असून माझे चिन्ह पाना आहे. माझ्या पक्षासाठी मी महायुतीत पाच ते सहा जागा मागितल्या आहेत, असेही राणा म्हणाले.

## मी राष्ट्रवादीतच, नड्डांनी गळ्यात मफलर टाकला होता पण.., भाजप प्रवेशाला नाथाभाऊंचा फुलस्टॉप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०जळगाव**

'मी कधीही भाजपात प्रवेश केलेला नाही. मी आजही शरद पवारांच्या पक्षात आहे. पूर्वीही होतो. राष्ट्रवादी काँग्रेसचा राजीनामा मी दिला होता परंतु, पक्षाध्यक्षांकडून स्वीकारला गेला नाही. मला भाजपात प्रवेश द्यावा अशी विनंती मी कधीच केली नव्हती. भाजपाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी मला भाजप जॉइन करा, अशी सूचना केली होती. त्यांना मी विचार करतो असे सांगितले होते त्यामुळे भाजप प्रवेशाच्या चर्चा सुरू झाल्या.'

'भाजपाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी मला भाजप प्रवेशाच्या सूचना दिल्या होत्या. त्यावर मी थोडा वेळ मागितला होता. मात्र त्यांच्याकडून मला वेळ कशाला हवा? तत्काळ प्रवेश करा, असे सांगितले गेले. दिल्लीत मी होतो. विनोद तावडे आणि रक्षाताई खडसे यांच्यासह मी जेपी नड्डांना भेटलो. त्यावेळी त्यांनी माझ्या गळ्यात मफलर टाकत स्पष्ट सांगितलं की तुमचा भाजप प्रवेश झाला.



परंतु, या प्रवेशाला राज्यातील काही नेत्यांकडून विरोध झाला. त्यामुळे माझा प्रवेश थांबला. तशीही माझी भाजप प्रवेशाची इच्छा नव्हतीच. मात्र वरिष्ठांकडून सूचना आल्याने मी विचार केला होता', असा खुलासा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत केला.असे कोणते नेते आहेत ज्यांच्यामुळे तुमचा पक्ष प्रवेश रोखला गेला असा प्रश्न विचरला असता खडसे म्हणाले, लोकसभेचया निवडणुकीत भाजपाच्या फक्त ९ जागा निवडून आल्या. महाराष्ट्रात भाजपाची परिस्थिती नाजूक आहे असे सर्व्हे आणि बातम्या येत होत्या. त्यामुळे भाजपला बळकटी मिळावी या हेतूने वरिष्ठांनी मला प्रवेशाची सूचना केली असावी.

ज्यावेळी रक्षाताई निवडणुकीसाठी उभ्या राहिल्या. त्यावेळी मी त्यांना मदत केली. नंतर त्या निवडूनही आल्या. इथपर्यंत सगळं ठीक होतं. नंतर मात्र नाथाभाऊंच्या प्रवेशाचा आम्ही विरोध करतो, त्यांना आम्ही साथ देणार नाही, आमचं केडर बंद पडेल असे मुद्दे पुढे केले गेले. खरंतर चाळीस वर्ष खस्ता खाऊन राज्यात भाजप उभा केला. आज जे मला विरोध करत होते त्यावेळी ते माझ्याच हाताखाली काम करत होते. आता मला विरोध करत आहेत. तसाही मी भाजपात जाण्यास इच्छुक नव्हतोच. भाजपाच्या वरिष्ठांनी सूचना केली म्हणून मी प्रवेशाची तयारी केली होती. शरद पवार आणि जयंत पाटील यांच्याबरोबर चर्चा करूनच मी भाजपात जाण्याचा निर्णय घेतला होता.

## काल अमित शाहांचा मुंबई दौरा, आज भाजपा 'ॲक्शन मोड'मध्ये; विधानसभेसाठी 'नवा प्लॅन'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

महाराष्ट्रात सध्या विधानसभा निवडणुकीच्या चर्चा सुरु आहेत. लवकरच विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर होण्याची शक्यता आहे. महायुती, महाविकास आघाडी आणि इतर महत्त्वाचे पक्ष आतापासूनच विविध प्लॅन आखताना दिसत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा कालच मुंबई दौरा




झाला. मुंबईतील काही गणपती बाप्पांचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी महायुतीच्या महत्त्वाच्या नेतेमंडळींशी चर्चा केली. अमित शाहांच्या कालच्या दौऱ्यानंतर आज भाजपा 'ॲक्शन मोड'मध्ये आली असून, त्यांनी विधानसभेसाठी 'नवा प्लॅन' जाहीर केला आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रदेश भारतीय जनता पार्टीतर्फे व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आल्याची माहिती माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी मंगळवारी दिली. त्यांना या समितीचे अध्यक्ष करण्यात आले आहे. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार स्थापन करण्याच्या निर्धाराने पक्ष कार्यकर्ते सज्ज झाले आहेत, असेही यावेळी दानवे यांनी नमूद केले.

दानवे म्हणाले, बूथपर्यंतची यंत्रणा सक्षम करण्यासाठी पक्षातर्फे ही व्यवस्थापन समिती तयार करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीचे नियोजन, संचलन करण्यासाठी प्रदेश, जिल्हा, तालुका स्तरावर अधिवेशने झाली आहेत. विधानसभा निवडणूक व्यवस्थापन समिती अंतर्गत विविध स्तरांवर समित्या गठित करण्यात आल्या आहेत. अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष दिलीप कांबळे, अनुसूचित जाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री अशोक नेते, आ. श्रीकांत भारतीय यांची सहसंयोजक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

विशेष आमंत्रित म्हणून केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, भाजपा मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, माजी केंद्रीय मंत्री खा. नारायण राणे, माजी मंत्री गणेश नाईक, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज अहिर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर पदसिद्ध सदस्य म्हणून प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, विक्रांत पाटील, माधवी नाईक, विजय चौधरी आणि संजय केनेकर काम पाहणार आहेत.

### विविध समित्यांचे प्रमुख

जाहीरनामा समिती– वन व सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार
विशेष संपर्क– उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील
सामाजिक संपर्क– राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे
महिला संपर्क– राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर
कृषी क्षेत्र संपर्क– खा. अशोक चव्हाण
लाभार्थी संपर्क– महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील
युवा संपर्क– केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे
प्रचार यंत्रणा– सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण
सहकार क्षेत्र संपर्क– विधान परिषद गटनेते प्रवीण दरेकर
मीडिया– आ.अतुल भातखळकर
ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्था संपर्क– केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ
अनुसूचित जाती संपर्क– माजी आमदार भाई गिरकर
अनुसूचित जमाती संपर्क– आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित
सोशल मीडिया– आ. निरंजन डावखरे
निवडणूक आयोग संपर्क– माजी खा. किरीट सोमय्या
महायुती निवडणूक अभियान समन्वयक– ग्रामीण विकास मंत्री गिरीश महाजन

### सुट्टीची सुचना

**उद्या दिनांक बुधवार दि. ११ सप्टेंबर २०२४ रोजी महालक्ष्मी पुजनानिमित्त कार्यालयाला सुटी असल्यामुळे दैनिक विदर्भ प्रजासत्ताक अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचकांनी व जाहिरातदारांनी नोंद घ्यावी.**

**– संपादक**

## विधानसभेची रणधुमाळी सुरु; रामदास आठवलेंनीही २० जागांवर दावा ठोकला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० पुणे**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राज्यात सर्वच पक्षांकडून मोर्चेबांधणी सुरु झालीयं. महायुतीच्या तिन्ही घटक पक्षांमध्ये जागावाटपाची चर्चा सुरु असतानाच महायुतीचा घटक पक्ष आरपीआयनेही जागावाटपात उडी घेतलीयं. विधानसभा निवडणुकीसाठी आम्ही २० जागांची मागणी करणार असल्याचं केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी स्पष्ट केलंय. यावेळी आठवलेंनी राज्यातील विविध मुद्द्यांवर भाष्य केलंय. ते पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.



पुढे बोलताना रामदास आठवले म्हणाले, मागील निवडणुकीत आम्ही १३ जागांवर निवडणूक लढवली होती. त्यातील ५ जागांवर आमचा विजय झाला होता. लोकसभा निवडणुकीत महायुतीकडे आम्ही २ जागांची मागणी केली, मात्र महायुतीने एकही जागा दिली नाही, शिर्डीची जागा आम्हाला मिळाली असती तर महायुतीचे माजी खासदार सुजय विखे निवडून आले असते, आता विधानसभेला आम्ही एकूण २० जागांची मागणी करणार असल्याचं रामदास आठवलेंनी स्पष्ट केलंय.आरपीआय पक्षाला देशात मान्यता असून आमच्या पक्षावर उमेदवार उभे करणं आवश्यक आहे. त्यामुळे महायुतीतील तिन्ही पक्षांनी आरपीआयकडे लक्ष देणं आवश्यक आहे. आरपीआयला सन्मान देण्याची तिन्ही पक्षाची जबाबदारी आहे, ते आमचा विचार करतील अशी अपेक्षा असल्याचंही रामदास आठवले यांनी स्पष्ट केलंय.

## मला कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता - अनिल देशमुख

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० नागपूर**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मला अडकवण्यासाठी प्रयत्न करत असून त्यासाठी पोलिसांवर दबाव टाकला जात आहे. त्यामुळे मला कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता असल्याचे माजी मंत्री अनिल देशमुख यांनी म्हटले आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना अनिल देशमुख यांच्याकडून भाजप नेते गिरीश महाजन यांना खोट्या गुन्हात अडकवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणात अनिल देशमुख यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता या प्रकरणात देशमुख यांनी फडणवीसांवर गंभीर आरोप केले आहेत.

देवेंद्र फडणवीस हे मागील चार वर्षे पूर्वीची घटना उकरून काढत असून माझ्याविरुद्ध दिल्लीच्या मदतीने सीबीआयमध्ये गुन्हा दाखल केला आहे. चार वर्षांपूर्वी मी गृहमंत्री असताना जळगावच्या एका घटनेमध्ये भाजप नेते गिरीश महाजन यांच्यावर कारवाई करण्यासाठी मी जळगावच्या पोलिस अधिकाऱ्यावर दबाव टाकला होता, असा आरोप माझ्यावर करण्यात आला आहे. मला मिळालेल्या माहितीनुसार माझ्यावर रेट टाकून मला अटक करण्याचा प्रयत्न देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केला आहे. दिल्लीच्या मदतीने ते ईडी आणि सीबीआयला हाताशी धरून महाराष्ट्राचे राजकारण अतिशय खालच्या स्तरावर आणत असल्याची टीका देखील अनिल देशमुख यांनी केली आहे.

## केजरीवाल सरकार संकटात? भाजप आमदारांचे 'ते' पत्र राष्ट्रपतींनी पाठवले गृह मंत्रालयालाकडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० नवी दिल्ली**

मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आप सरकार जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दिल्लीत राष्ट्रपती राजवट लागण्याची चर्चा सुरू झाली आहे. त्याला कारण ठरले आहे, भाजप नेत्यांनी राष्ट्रपतींची घेतलेली भेट! दिल्लीतील सरकार बरखास्त करण्याची मागणी आमदारांनी राष्ट्रपतींकडे केली. ते पत्र आता राष्ट्रपती भवनाने केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या गृह मंत्रालयाकडे पाठवले आहे.

मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे तुरुंगात असून, दिल्लीतील सरकारच्या कारभाराबद्दल भाजप आमदारांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. दिल्लीतील सरकार बरखास्त करण्याची मागणी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन केली. तसे पत्र भाजप आमदारांनी राष्ट्रपतींना दिले.

### ते पत्र राष्ट्रपतींनी पाठवले गृह मंत्रालयाकडे

दिल्लीतील केजरीवाल सरकार बरखास्त करण्याची मागणी करणारे भाजप आमदारांच्या पत्राची राष्ट्रपती भवनाकडून दखल घेण्यात आली आहे. राष्ट्रपती भवन सचिवालयाने हे पत्र केंद्रीय गृह मंत्रालयाकडे पाठवले आहे. केंद्रीय गृह सचिवांना पत्र पाठवण्यात आल्याचे राष्ट्रपती भवन सचिवालयाचे संचालक शिवेंद्र चतुर्वेदी यांनी कळवले आहे.

### दिल्लीत राष्ट्रपती राजवट लागणार?

केजरीवाल सरकार बरखास्त करण्याची मागणी करणारे पत्र गृह मंत्रालयाकडे पाठवण्यात आल्याच्या माहितीनंतर दिल्लीत राष्ट्रपती राजवट लागण्याच्या चर्चेने डोके वर काढले आहे. सरकारचे प्रमुख असलेले अरविंद केजरीवालच तुरुंगात असल्याचा मुद्दा भाजप आमदारांकडून मांडण्यात आलेला आहे.

## जीएसटी परिषदेमध्ये विमा हप्त्यावरील टॅक्स कमी करण्यावर चर्चा; अजित पवारांची परिषदेला दांडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० नवी दिल्ली**

विमा हप्त्यावरील १८ टक्के जीएसटी कमी करण्यावर जीएसटी परिषदेमध्ये सोमवारी व्यापक सहमती झाली. परंतु, यासंदर्भात निर्णय मात्र पुढील बैठकीपर्यंत पुढे ढकलण्यात आला आहे. याशिवाय दोन हजारांपेक्षा कमी रकमेच्या डिजिटल व्यवहारांवर जीएसटी लावण्याचा निर्णयही तूर्तास स्थगित ठेवण्यात आला आहे.

जीएसटी परिषदेची ५४ वी बैठक आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली सुषमा स्वराज भवनात पार पडली. या परिषदेतला



काही राज्यांचे मुख्यमंत्री तसंच अर्थमंत्री उपस्थित होते. आयुर्विमा तसंच आरोग्य विम्यावर लावण्यात येणाऱ्या १८ टक्के जीएसटीवरून केंद्र सरकारवर टीका होत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जुलै महिन्यात केंद्रीय अर्थमंत्र्यांना पत्र लिहून विम्यावरील जीएसटी कमी करण्याची मागणी केली होती. यानंतर गेल्या अर्थसंकल्पी अधिवेशनातही विरोधकांनी हीच मागणी लावून धरली होती. यामुळे आजच्या बैठकीत यावर निर्णय होण्याची अपेक्षा होती. त्यानुसार या मुद्यावर चर्चाही झाली.

बहुतांश मंत्र्यांनी ही मागणी लावून धरल्याने यावर व्यापक सहमती झाल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले. परंतु याबद्दल नेमकी कार्यपद्धती कशी असेल, याबद्दल मात्र पुढील जीएसटी बैठकीत निर्णय होणार असल्याचे स्पष्ट केले. दोन हजार रुपयांपेक्षा कमी व्यवहार होणाऱ्या डिजिटल व्यवहारांवर कर लावण्याचा निर्णय तूर्तास स्थगित ठेवण्यात आला आहे. दोन हजार रुपयांपेक्षा कमी रकमेच्या व्यवहारांवर १८ टक्के कर लावण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला होता. या निर्णयावरसुद्धा तीव्र नापसंती व्यक्त करण्यात आली होती. अखेर हा निर्णय सुरक्षित ठेवण्यात आला आहे. यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे.

## संपादकीय ......

# राजकारणाच्या आखाड्यात नवे खेळाडू

क्रीडा आणि राजकारण या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे म्हटले तर ते काहीअंशी बरोबरही ठरेल. आजच्या युगात खेळातही राजकारण आहे आणि राजकारणात खेळणे ही एक मोठी कला आहे. कुस्तीच्या रिंगणातून बाहेर पडून विनेश फोगट आणि बजरंग पुनिया या कुस्तीपटूंनी राजकीय आखाड्यात प्रवेश केला आहे. या दोन्ही पैलवानांनी काँग्रेससोबत राजकीय कारकीर्द सुरू केली.

हरियाणा विधानसभा निवडणुकीत फोगट काँग्रेसच्या उमेदवार असून, बजरंग पुनिया यांना अखिल भारतीय किसान काँग्रेसचे कार्याध्यक्ष बनवण्यात आले आहे. दोघांनीही काँग्रेसची निवड का केली आणि काँग्रेसने त्यांना का स्वीकारले, हा स्वतंत्र चर्चेचा विषय आहे; मात्र क्रीडा क्षेत्र सोडल्यानंतर अनेकदा खेळाडू महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी राजकारणात आपली नवी इनिंग सुरू करतात. हा ट्रेंड नवीन नाही. अनेकवेळा असेही घडते की, राजकीय पक्ष आपली प्रतिमा उंचावण्यासाठी क्रीडा जगतातील चमकदार तारे संसद आणि विधानसभेवर नियुक्त करतात. याची अनेक उदाहरणे आहेत. यूपीए सरकारच्या काळात मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरला राज्यसभेत पाठवण्याचे काम काँग्रेसने केले. तसेच भाजपने गेल्या १० वर्षांत बॉक्सर मेरी कोमपासून ते पी. टी. उषापर्यंत सर्वांनाच वरिष्ठ सभागृहात उमेदवारी देण्याचे काम केले. मेरी कोम यांना २०१६ मध्ये राष्ट्रपतींनी राज्यसभेसाठी नामांकित केले होते, तर पी. टी. उषा यांना २०२२ मध्ये राज्यसभेसाठी नामांकन दिले होते. क्रीडा क्षेत्रात खेळी पूर्ण करून राजकारणात दाखल झालेले खेळाडू केवळ संसद आणि विधानसभेची शोभाच राहिले, असे नाही. क्रिकेट, कुस्ती आणि अन्य खेळांमध्ये ठसा उमटवल्यानंतर राजकारणात खेळाडूंनी छाप सोडली आहे. असे अनेक खेळाडू आहेत, जे क्रीडा क्षेत्रात भलेही चमकले नसले, तरी राजकारणात त्यांनी एक नवे स्थान मिळवले आहे. तेजस्वी यादव हे त्याचे उदाहरण आहे, ज्यांनी रणजी करंडक खेळला आणि त्यानंतर क्रीडा जगताला सोडून राजकारणात प्रवेश केला. सध्या ते बिहारच्या राजकारणातील एक प्रमुख चेहरा आहेत. बिहारचे राजकारण दोन नेत्यांभोवती फिरते. यामध्ये एक मुख्यमंत्री नितीशकुमार आणि दुसरे विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव आहेत. कुस्तीच्या आखाड्यातून राजकारणात चमकण्यासाठी आलेल्यांमध्ये मुलायमसिंह यादव यांचे नाव ठळकपणे घेतले जाते. मुलायमही कुस्तीपटू राहिले आहेत. समाजवादी पक्षाचे नाथू सिंह यांचे शिष्य मुलायम १९६७ मध्ये जसवंतनगर विधानसभेची जागा जिंकून आमदार झाले. त्यानंतर त्यांनी राजकारणात मागे वळून पाहिले नाही. ते तीन वेळा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री राहिले आहेत. याशिवाय ते केंद्रात संरक्षणमंत्रीही राहिले आहेत.

खेळाडूंनी क्रीडा क्षेत्र सोडून राजकारणात येण्याची प्रक्रिया गेल्या एक-दोन दशकांपासून सुरू झालेली नाही. स्वतंत्र भारताच्या पहिल्या लोकसभा निवडणुकीपासून ही परंपरा सुरू झाली आहे. लोकसभा निवडणुकीत क्रीडा क्षेत्र सोडून राजकारणात उतरणारे करणी सिंह हे देशातील पहिले खेळाडू होते. ते एक निपुण क्ले स्कीट शूटर होते. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व केले. पाच ऑलिम्पिक खेळांमध्ये सहभागी होणारे ते पहिले भारतीय खेळाडू ठरले. १९५२ मध्ये राजकारणात प्रवेश करून करणी सिंह यांनी बिकानेर मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून लोकसभा निवडणूक जिंकली. त्यांची राजकीय कारकीर्द १९५२ ते १९७७ अशी होती. या काळात त्यांनी बिकानेर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत पाच वेळा लोकसभा निवडणूक जिंकून संसदेत आवाज उठवला. राजकारणातील खेळाडूंचा प्रवेश एवढ्यापुरता मर्यादित नव्हता. करणी सिंहांपासून सुरू झालेला हा ट्रेंड वाढतच गेला. क्रीडा जगत सोडून राजकारणाच्या क्षेत्रात उतरलेल्या खेळाडूंची संख्या कमी नाही. यामध्ये मन्सूर अली खान पतौडी, नवज्योतसिंग सिद्धू, चेतन चौहान, चेतन शर्मा, कीर्ती आझाद, अझरुद्दीन, युसूफ पठाण, गौतम गंभीर, रवींद्र जडेजा यांसारख्या क्रिकेट जगतातील अनेक खेळाडूंची नावे आहेत. नेमबाजी चॅम्पियन राज्यवर्धन सिंह राठौड, बॉक्सर विजेंद्र सिंग, पॅराॲथलिट देवेंद्र झाझारिया, कुस्ती चॅम्पियन बबिता फोगट, फुटबॉलपटू प्रसून बॅनर्जी, हॉकीपटू दिलीप तिर्की अशा अनेक नावांचा समावेश आहे; पण या खेळाडूंनी क्रीडा मैदानावर जी जादू दाखवली, ती राजकीय खेळपट्टीवर साकारता आली नाही. क्रीडा विश्वात त्यांनी कमावलेली कीर्ती आणि नाव राजकारणात येऊन प्रसिद्धी आणि पद मिळवण्यात त्यांना अपयश आले. खेळातून बाहेर पडून राजकारणात आपला ठसा उमटवणार्या खेळाडूंची संख्या कमी आहे. फार कमी खेळाडूंना राजकीय खेळपट्टीवर दीर्घकाळ कारकीर्द टिकवून ठेवण्यात यश आले आहे. यात कीर्ती आझाद आणि नवज्योतसिंग सिद्धू यांसारख्या काही खेळाडूंच्या नावांचा समावेश आहे.

दुसरीकडे राजकारणात अनेक तज्ज्ञ खेळाडू आहेत, ज्यांनी खेळावर राज्य केले. शरद पवार, अरुण जेटली, जय शहा, रोहन जेटली, राजीव शुक्ला, ब्रिजभूषण शरण सिंह अशी अनेक नावे आहेत. शरद पवार यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्षपदही भूषवले आहे. २०१० ते २०१२ पर्यंत त्यांनी आयसीसीचे अध्यक्ष म्हणूनही काम केले आहे. त्याचप्रमाणे भाजप नेते अरुण जेटली १९९८ मध्ये दिल्ली आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सदस्य होते. पुढच्याच वर्षी अध्यक्ष झाले आणि डिसेंबर २०१३ पर्यंत ते या पदावर होते. ते अनेक वर्षे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) उपाध्यक्ष होते आणि २००८ ते २०१५ पर्यंत बीसीसीआय कार्यकारी प्रशासकीय समितीचे सदस्यही होते. याशिवाय काँग्रेस नेते राजीव शुक्ला यांचाही क्रिकेटच्या राजकारणात चांगलाच दबदबा आहे. शुक्ला हे क्रिकेटच्या राजकारणातील एक खेळाडू आहेत. क्रिकेटच्या राजकारणात त्यांचा हस्तक्षेप अजूनही सुरूच आहे.




## ३० दिवस सलग खा रिकाम्या पोटी केळे, दूर होतील अनेक आजार

**दि.१० विदर्भ प्रजासत्ताक**

दररोज केळे खाल्ल्याने पोट आणि शरीराशी संबंधिक अनेक समस्या दूर होतील. आरोग्य तज्ञांच्या मते दररोज १ केळे खाल्ले पाहिजे. यामुळे शरीरास अनेक फायदे मिळतात. फळांचा राजा भले आंबा असला तरी केळे खाल्ल्याने अनेक फायदे होतात.



केळे हे खाण्यास चविष्ट आणि आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असे फळ आहे. केळे खाल्ल्याने मोठ्या प्रमाणात एनर्जी मिळते. दररोज केळे खाल्ल्याने शरीरास अनेक फायदे मिळतात. केळ्यामध्ये व्हिटामिन आणि मिनरल्स मोठ्या प्रमाणात असतात.

केळ्यामध्ये व्हिटामिन ए, व्हिटामिन सी, व्हिटामिन बी६, पोटॅशियन, सोडियम, आर्यन आणि अनेक दुसरे अँटीऑक्सिडंट असतात. केळ्यामध्ये हाय कॅलरीज असतात. तसेच हे खाल्ल्याने संपूर्ण दिवस तुम्हाला एनर्जेटिक वाटते. यात मोठ्या प्रमाणात प्रोटीन, कार्ब्स, फायबर, मॅग्नेशियम, कॉपरसारखी पोषकतत्वे असतात.

दररोज एक केळे खाल्ल्याने होतात हे फायदे

केळे खाल्ल्याने पाचन सुधारते. यामुळे दररोज १-२ केळी खाल्ली पाहिजेत. यामुळे पोट आणि पचन सुधारते. केळ्यामध्ये मोठ्या प्रमाणात फायबर असते. हे खाल्ल्याने बद्धकोष्ठतेशी सबंधित समस्या दूर होतात.

# तुमचं आधार बँक खात्यासोबत लिंक आहे की नाही? हे कळेल आता तुमच्या मोबाईलवर

**विदर्भ प्रजासत्ताक**

सध्या 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेची चर्चा सर्वत्र सुरू आहे. त्यात काही महिला लाभार्थ्यांचे पैसे जमा न झाल्याने त्यांच्यामध्ये प्रचंड गोंधळ निर्माण झाला आहे. बँक खात्याला आधार लिंक नसल्याने अनेकांच्या खात्यात पैसे जमा झाले नसल्याची माहिती समोर आली आहे.

त्यामुळे आता बँकांमध्ये बँक खात्याला आधार लिंक करण्यासाठी गर्दी होत आहे. शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ घ्यायचा असेल किवा शासकीय अनुदानाचा विषय असेल तर आधारकार्ड बँक खात्याशी लिंक करणे आवश्यक आहे.

जर तुमचे आधार बँकेशी लिंक नसेल, तर तुम्हाला कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ मिळू शकणार नाही, कोणतीही सबसिडी तुमच्या खात्यात जमा होणार नाही. तुम्ही तुमचे बँक खाते आधारशी लिंक करणे आवश्यक आहे.

जर तुमचे आधार बँकेशी लिंक असेल तर तुम्ही आधारच्या माध्यमातून बँकेशी सहज व्यवहार करू शकता. तुमचे बँक खाते आधारकार्डशी लिंक आहे की नाही, हे तुम्ही सहज तपासू शकता.

स्थिती कशी तपासायची?

युनिक आयडेंटिफिकेशन अर्थॉरिटी ऑफ इंडिया माय आधारच्या अधिकृत पोर्टलला भेट देऊन तुमची कोणती बँक खाती आधारकार्डशी लिंक आहेत, हे तुम्ही सहज तपासू शकता. जर तुम्हाला ते तपासायचे असेल, तर आम्ही दिलेल्या स्टेप्स फॉलो करा.

कसे तपासाल

पुढील लिंकवर क्लिक करा हीींि://ळिवरळ. सीं.ळप/




माय आधार टॅबवर क्लिक करा आणि ड्रॉप डाऊन मेनूवर जा आणि आधार सेवा निवडा, आधार आणि बँक खाते लिंकिंग स्थिती तपासा या पर्यायावर क्लिक करा.

पुढील पेज उघडेल ज्यामध्ये तुम्हाला आधार क्रमांक दिसेल.

### बँक खाते लिंक नसल्यास काय करावं?

तुमचे खाते आधारकार्डशी लिक झाले आहे की नाही, हे जाणून घेण्यासाठी तुम्ही बँकेतही जाऊ शकता. खात्याशी आधार लिंक नसल्यास तुम्ही बँकेत आधार लिकचा अर्ज भरा. तुमची आधार आणि पॅनसंदर्भात माहिती द्या. केवायसी करा आणि त्यानंतर काही मिनिटांत तुमचं आधारकार्ड पॅनकार्डशी लिंक होईल.

पुढे सेंड ओटीपीवर क्लिक करा आणि येथे नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर प्राप्त झालेला ओटीपी टाका.

ओटीपी टाकल्यानंतर तुम्हाला कळेल की तुमच्या आधार कोणत्या बँकेशी जोडलेले आहे.

# ९० हजार नागरिकांनी भरला वाढीव दराने ७० कोटींचा कर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० अमरावती** – शहरातील ९० हजार नागरिकांनी ६ महिन्यांत पाच वेळा सवलतींसह मुदतवाढ दिल्यानंतर वाढीव दराने ७० कोटी रुपये कर भरला आहे. एकूण ३ लाख मालमत्ता धारकांपेकी ९० हजार अर्थात २९.८८ टक्के नागरिकांनी हा कर भरला असून, वाढीव मालमत्ता कराकडे ७०.१२ टक्के नागरिकांनी पाठ फिरवल्याचे दिसून आले आहे.

मनपाने वाढीव करवाढ लागू केल्यानंतर शहरात याबाबत तीव्र असंतोष निर्माण झाला होता. अनेकदा विरोध, आंदोलने झाली. विशेष म्हणजे वाढीव मालमत्ता कराला ही दुसऱ्यांदा स्थगिती आहे. याआधी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाढीव करवाढीला



स्थगिती दिली होती. आता ५ सप्टेंबरला मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने नगरविकास विभागाने स्थगिती दिली आहे. ही स्थगिती असून वाढीव कर रद्द झाला नाही. तर केवळ जुन्याच दराने मालमत्ता कर भरण्याची दिलासादायक मुभा मिळाली आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाला मालमत्ता कराबाबत विचारपूर्वक निर्णय वाढीव मालमत्ता कराला शासनाने स्थगिती दिल्यामुळे आता नागरिक जुन्याच दराने कर भरतील. ही केवळ स्थगिती आहे. करवाढ पूर्णत: रद्द करण्यात आली नाही. त्यामुळे याबाबत विचारपूर्वक निर्णय घ्यावा लागणार आहे. -सचिन कलंत्रे, प्रशासक, महापालिका. घ्यावा लागणार आहे. महापालिकेने सुमारे १५ वर्षानंतर वाढीव दराने मालमत्ता कर लागू केला. त्यानंतर या करवाढीबाबत शहरवासीयांमध्ये असंतोष असल्याने जनप्रतिनिधींनी मुख्यमंत्र्यांकडून त्याला स्थगिती मिळवली आहे. ज्यावेळी वाढीव मालमत्ता कर शासन पूर्णपणे रद्द करेल त्याचवेळी नागरिकांना पूर्ण दिलासा मिळणार आहे. परंतु, शासन वाढीव कर रद्द करणार की नाही, याबाबत मात्र सध्या तरी प्रश्नचिन्ह आहे. तोवर जुन्या दराने मालमत्ता धारकांना कर भरावा लागणार असून मनपाला तो स्वीकारावा लागणार आहे.

# जिल्ह्यात मोबाईल व्हॅनद्वारे मतदान यंत्र वापराबाबत जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अकोला,** आगामी विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने मतदारांमध्ये मतदान यंत्रांच्या वापराबाबत व मतदानाचा हक्क बजावण्याबाबत जागरूकता निर्माण होण्यासाठी इव्हीएम विविपॅट यंत्रांबाबत जनजागृती मोहिम दि. १० सप्टेंबर ते दि. ०९ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेअंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय अकोट, बाळापूर, अकोला, मुर्तिजापूर तसेच उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय या कार्यालयाच्या ठिकाणी इव्हीएम प्रात्यक्षिक केंद्रे (इव्हीएम डेमोस्ट्रेशन सेंटर इडीसी) निश्चित करण्यात आली आहेत.

त्याचप्रमाणे, प्रत्येक विधानसभा मतदारसंघात निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार दोन मोबाईल व्हॅनद्वारे प्रत्येक गाव, मतदान केंद्र स्थळावर मतदारांना मतदान यंत्रांची (ईव्हीएम व विविपॅट) प्रात्यक्षिके दाखविण्यात येणार आहेत. प्रात्यक्षिकांदरम्यान मतदारांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राव्दारे मतदानाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे.



जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघनिहाय ईव्हीएम व विविपॅट जनजागृती व प्रात्यक्षिकांचे वेळापत्रक हीींि://रज्ञेश्र.सेीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

त्याचप्रमाणे, ही सुविधा सामान्य निवडणूक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय, अकोट, बाळापूर, अकोला, मुर्तिजापूर व उपजिल्हाधिकारी (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे उपलब्ध आहे. अकोला जिल्ह्यातील सर्व नागरीकांनी ईव्हीएम प्रात्यक्षिक केंद्रे तसेच मोबाईल व्हॅनव्दारे केल्या जाणा-या प्रात्यक्षिकांच्या ठिकाणी मतदान यंत्रांचे अवलोकन करुन प्रत्यक्ष मतदान करण्याचा अनुभव घ्यावा तसेच मतदान यंत्रांच्या प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती मोहिमेमध्ये आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अजित कुंभार यांनी केले आहे.

# १०१ शिक्षकांचा सत्कार सोहळा संपन्न

## पंडित नंदकिशोर शर्मा यांचा पुढाकार जयस्वाल यांचे तर्फे स्वर्ग रथ व शवपेटी संस्थेला भेट

***विदर्भ प्रजासत्ताक***

***दि.१०अचलपूर :*** स्वामी विवेकानंद विचारमंच बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र व भागवताचार्य पंडित नंदकीशोर शर्मा सार्वजनिक ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने अचलपूर येथील जगदंब महाविद्यालयात आज शिक्षण दिन आणि दिग्विजय दिना निमित्त शिक्षक सम्मान समारोहाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सुबोध शिक्षण संस्थेचे सचिव तथा ज्येष्ठ पत्रकार डॉ अनंतराव भारतीय , प्रमुख वक्ता सुभाष लोहे, प्रमुख अतिथी डॉ राजशेखर बालेकर ग्रंथालय भारती नागपूर प्रमुख उपस्थिती डॉ राजेश उभाड महेश गणोरकर सुधिर रसे . या सम्मान समारोहना १०१ शिक्षकाचा सत्कार करण्यात आला तसेच स्व देवकाबाई नंदकीशोर जयस्वाल यांच्या पावन स्मृती प्रित्यर्थ संस्थेला प्रकाश जयस्वाल यांनी स्वर्गरथ व शवपेटी संस्थेला सप्रेम भेट दिल्याबद्दल सत्कार करण्यात आला याप्रसंगी कमलेश भट्ट, सुनिल ठाकरे ,गिरिष आसरकर, राजेश खोलापुरे , डॉ निलेश तारे सतिश भागवत इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती. प्रस्ताविक पंडित गजानन शर्मा यांनी केले सूत्रसंचालन राजकुमार महल्ले यांनी केले तर आभार सक्षम पाचपोर यांनी मानले।यशस्वीतेसाठी पंडित गजानन शर्मा स्वप्निल तिडके प्रज्वल कोल्हे तन्मय तट्टे सक्षम पाचपोर निशांत मेहरे वेदांत गजघुमे आदींनी अथक परिश्रम घेतले.



RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १० सप्टेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# शिवसेना (उबाटा) चे बडनेरा विधानसभा मध्ये युथ कॉंग्रेस काम करणार नाही

## यूथ कॉंग्रेसचे माजी प्रदेश सचिव समीर जवंजाळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० अमरावती**

अचलपूर मध्ये ७ सप्टेंबर रोजी शिवसेना (उबाटा) ने कॉंग्रेसच्या विरोधा उघड भूमिका घेऊन विधानसभा निवडणुकी मध्ये समर्थन न करण्यासाठी पत्रकारांच्या माध्यमाची घोषणा केली होती. त्याला प्रतिउत्तर म्हणून बडनेरा विधानसभा मध्ये यूथ कॉंग्रेस चे माझी प्रदेश सचिव समीर जवजाळ महाविकास आघाडीत शिवसेना (उबाटा) ने प्रेस कान्फ्रेंस के माध्यम से जे काही बोलले ते ठीक नाही. आमचे नेते जिला प्रमुख बबलू भाऊ देशमुख यांच्या विरोधात शिवसेना (उबाठा) द्वारे खुलेआम विरोध करणे योग्य आहे नाही. महविकास आघाडी धर्म पाळला पाहिजे. शिवसेनेचे राष्ट्रीय नेते सुद्धा कॉंग्रेस विरोधात पवित्रा घेत नाही. उलट आघाडीचा धर्म जोपासत कॉंग्रेस एकमेकांना आधार देते. नेहमी आपल्या मदतीला साथ देते. जर काही



समस्या असेल तर त्याला बैठक घेऊन जो विषय असेल त्याला न्याय देतात. उलट शिवसेना (उबटा) नेत्यांना निवडणुकी असे प्रकार करणे म्हणजे विरोधी पक्ष ला समर्थन करत आहे असे स्पष्ट दिसत आहे . कॉंग्रेस नेहमी सर्वांना सोबत घेऊन सर्वांना साथ देण्याचे काम करते. सहकार्याची अपेक्षा दोन्ही पक्षा कडून अपेक्षित आहे. कोणत्याही निवडीमध्ये विजय मिळवता येतो त्याकरीता सर्व पक्षांना एकजुट उमेदवार निवडून येते परंतु येथे तो स्थिती वेगळी बनत चाललेली आहे. त्यामुळे जर बडनेरा विधानसभा मध्ये शिवसेना (उबाटा) . ज्या कोणत्याही उमेदवारी देणार त्याला कोणत्याही तर यूथ



कॉंग्रेस देखील कोणत्याही प्रकारे मदत करणार नाही . सुरुआत शिवसेना (उबाठा) करत आहे अंत हम करेंगे. दुसऱ्या वेळी निवडणूक येणार आहेत. त्याचप्रमाणे बडनेरा सीटवर कॉंग्रेस आणि शिवसेना दोन्ही पक्षांची नजर आहे. दोघेही निवडूण इच्छुक आहेत. दोन्ही पार्ट्यांकडून बडनेरा मध्ये टिकट के दावेदार टिकट काढण्यासाठी संघर्ष करत आहेत. आता या दोघांच्या पदाधिकाऱ्यांच्या जुगलबंदी जंग चर्चा का विषय बनली आहे.

# श्री महालक्ष्मी उत्सवाचा अमृत महोत्सव सोहळा

## संयुक्त कुटुंबातील एकत्र महालक्ष्म्यांचे ७५ वे वर्ष

### पातुरकर - देशपांडे कुटुंब : तिसरी पिढी गिरवत आहे परंपरेचा कित्ता



**या वर्षी या श्री च्या उत्सवाचे अमृत महोत्सवी वर्ष**

सन १९४९ मध्ये भाजीबाजारातील लिडबिडे यांच्या वाड्यात वात्सव्यास आल्यापासून पातुरकर-देशपांडे कुटुंबीयांनी एकाच छताखाली दोन्ही महालक्ष्म्यांची स्थापना करण्याचा निर्णय घेतला.सन१९६२ मध्ये विलासनगर मध्ये ही दोन्ही कुटुंब एकाच घरात स्थायिक झाली. विलासनगर मध्ये हा उत्सव राजाभाऊ पातुरकर आणि बाबुराव देशपांडे यांनी पुढे सुरु ठेवला. आज कुटुंबातील दुसरी व तिसरी पिढी या उत्सवाचा अमृत महोत्सव एकत्रितपणे साजरा करीत आहे.

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० अमरावती**

या देवी सर्वभूतेशू ल क्ष्मी रु प ` ण संस्थीत:नमस्तस्यै,नमस्तस्यै, नमस्तस्यै नमो नम:या देवीच्या श्लोकाचे स्मरण करीत आज (ता १०) अमरावतीत सर्वत्र ज्येष्ठा-कनिष्ठा गौरींची उत्साहात स्थापना करण्यात आली.भाद्रपद महिन्यातील अनुराधा नक्षत्रावर सर्वांचे दैवत असलेली श्री महालक्ष्म्या तीन दिवसासाठी माहेरवाशीण म्हणून येत असतात.अनेकांच्या घरी या उत्सवाला पिढ्यानपिढ्यांची परंपरा लाभली आहे.अमरावती मधील विलासनगरातील पातुरकर व देशपांडे यांचेकडील महालक्ष्म्यांना तीन पिढ्यांची परंपरा लाभली आहे.आधुनिक युगात जिथे एकत्र कुटुंब पध्दती एक स्वप्न वाटते तिथे पातुरकर-देशपांडे कुटुंबातील भाऊ-बहीण-जावई,त्यांची मुले,मामा-मामी,काका-काकु आणि नातवंड असे सर्व सदस्य एकत्र उत्सव साजरे करतात. अमरावती येथील माजी उपजिल्हाधिकारी मोहन पातुरकर आणि रेल्वेतून सेवानिवृत्त शेखर देशपांडे व विवेकानंद लायब्ररीत कार्यरत महेश देशपांडे हे नात्याने आते मामे भाऊ.ही दोन्ही कुटुंब एकत्रितपणे एकाच घरात हा उत्सव साजरा करतात.

# नियोजनशून्य कारभार: येवदावासीयांना भर पावसाळ्यात पाण्याचे चटके

## दूषित पाणीपुरवठा, एकीकडे धरणातून विसर्ग, तर दुसरीकडे पाणी कपात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० दर्यापूर -**

सध्या पावसाळा सुरू असतानाही जवळपास २० हजार लोकसंख्या असलेल्या येवद्याला मागील तीन वर्षांपासून तीन ते चार दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे. पाण्यावाचून नागरिकांसह पाळीव प्राण्यांचे हाल होत आहेत. नागरिकांना पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नियोजनशून्य कारभाराचा फटका येथील नागरिकांना बसत आहे. त्याबाबत त्यांनी संताप व्यक्त केला आहे.

खारपाणपट्टयात येत असल्याने जमिनीतील पाणी पिण्यायोग्य नसल्याने शहानूर धरणातून होत असलेल्या पाणीपुरवठ्यावर येथील नागरिक अवलंबून आहेत. परंतु, अनियमित पाणी पुरवठ्यासह ठिकठिकाणी असलेल्या लिकेजमुळे नागरिकांना गढूळ पाणी पुरवठा होत आहे.

सध्या शहानूर धरण १०० टक्के भरले असून, धरणाचे दरवाजे उघडले आहेत. पाण्याचा विसर्ग सुरू आहे, तरी सुद्धा येवदावासीयांना भर पावसाळ्यात पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. ग्रामीण भागातील जनतेकडे साठवण क्षमता कमी असल्याने ते पाणी साठवू शकत नाहीत, तसेच शेती व्यवसाय असल्याने शेतकऱ्यांकडे असलेल्या जनावरांची सुद्धा तहान भागवण्याकरिता पाण्याची आवश्यकता आहे. एवढे पाणी साठवायचे कसे, असा प्रश्न नागरिकांसह शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.



या बाबत अनेक वेळा आंदोलने झाली. मजिप्राला वेळोवेळी निवेदने दिली. परंतु, झोपेचे सोंग घेतलेल्या प्राधिकरणाला कसलाच फरक पडत नसल्याचे दिसून येत आहे. माजी आमदार रमेश बुंदीले, विजय मेंढे, ओमप्रकाश शर्मा, रामदास कराळे यांनी दोन दिवसांपूर्वी दूषित व गढूळ पाणी घेऊन कार्यकर्त्यांसह मजिप्राच्या कार्यालयावर धडक दिली असता, कार्यालयात उपविभागीय अभियंता विजय शेंडे अनुपस्थित होते. याबाबत माजी आ. बुंदीले यांनी रोष व्यक्त करत अभियंत्याशी फोनवर संपर्क करून ताबडतोब येवदा येथील पाणीपुरवठा नियमित करावा तसेच लिकेज दुरुस्ती करावी, अशी ताकीद दिली. महिन्यातून केवळ ८ दिवस पाणीपुरवठा होत असून नळाचे बिल मात्र महिन्याचे येत आहे. येथील कर्मचारी सुद्धा केवळ ८ दिवस काम करून महिन्याचा पगार घेत आहेत. त्यामुळे वरिष्ठांनी याकडे लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. नागरिकांच्या समस्येकडे मजिप्राकडून होतेय दुर्लक्ष दूषित पाण्याची समस्या वारंवार मांडूनही प्राधिकरणाचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे या संदर्भात आता मानवाधिकार आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. -ओमप्रकाश शर्मा, सामाजिक कार्यकर्ता. नव्या टाकीच्या टेस्टिंगमुळे झाला गढूळ पाणी पुरवठा येवद्याला तीन दिवसानंतर पाणी पुरवठा होतो. त्यासाठी नवीन टाकीची जोडणी केली. त्याची टेस्टिंग सुरू आहे. त्यामुळे काही वेळ नळाद्वारे गढूळ पाणी पुरवठा झाला. मात्र, लगेच तो बंद केला. -विजय शेंडे, उपविभागीय अभियंता, मजीप्रा, दर्यापूर. नागरिकांची मागणी अशी येवद्याचा एक दिवसा आड होणारा पाणी पुरवठा तीन ते चार दिवसाआड कुणाच्या आदेशाने करण्यात आला, याची चौकशी करून जनतेला वेठीस धरणाऱ्या कर्मचाऱ्यांवर प्राधिकरणाने कारवाई करावी व पाणीपुरवठा नियमित करावा, अशी मागणी येथील नागरिकांकडून होत आहे.

# तळेगाव ठाकुर मध्ये उगविल्याच नाही सोयाबीन ला शेंगा

## शेतकऱ्यांवर ओढवले नवे संकट, कृषी विभागाने थेट शेतकऱ्याचा बांधावर जाऊन पाहणी केली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० तिवसा-** ७कमी कालावधीत व कमी मेहनतीत सोयाबीन पीक येत असल्याने विदर्भाचे नगदी पीक म्हणून सोयाबीन पिकाची ओळख निर्माण झाली आहे आणि सोयाबीन पेरणीकडे शेतकऱ्याचा कल मोठ्या प्रमाणात वाढला आहे परंतु तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकुर येथील शेतकऱ्यांनी पेरलेल्या सोयाबीन ला फुले व शेंगा न लागण्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.त्यामुळे आधीच डबघाईस असलेल्या शेतकऱ्यांवर नवीन संकट ओढावले आहे

तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर परिसरातील किमान ९ ते दहा शेतकऱ्यांनी आपल्या शेतात सोयाबीन ची पेरणी दरवेळेस प्रमाणे या हि वेळी केली. यावेळी शेतकऱ्यांनी ९३०५ हे वाण वापरले खत आणि फवारणी वेळोवेळी केली मात्र सोयाबीनच्या झाडांची वाढ जरी झाली असली तरी मात्र झाडांना शेंगा उगविल्याचं नसल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीची वातावरण निर्माण आले आहे तळेगाव ठाकूर मध्ये जनराधान बोबडे,सुरेश धांडे ,महादेव सपाटे ,दीपक श्रीखंडे,वासुदेव पोजगे,वसंत तिजारे ,सुरेंद्र ठाकूर,अमोल कावळकर यांनी आपल्या शेतात विकास,अमृत गोल्ड १९०३ या वाणाची पेरणी कर्ली आहे मात्र शेतकरी सध्या संभ्रमात आहे की नेमके बियाण्याचा दोष आहे की निसर्गाचा?या संदर्भात शेतकऱ्यांनी तिवसा येथील कृषी विभागात भेटून सोयाबीन पाहण्यासाठी विनंती केली असता कृषी अधिकारी थेट शेतात जाऊन पाहणी केली.मात्र समाधानकारक तोडगा कृषी अधिकारी काढू न शकल्याने पेरणीचा व बियाण्यांचा खर्च द्यावा अशी मागणी आता शेतकरी करू लागले आहेत. आधीच डबघाईस असलेल्या या शेतकऱ्यांवर आता हे नवीन



संकट आल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

यावेळी शेतकऱ्यांनी मागणी केली लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळावी.

# बावनकुळेंच्या मुलाच्या कारची पाच वाहनांना धडक

## नागपुरातील घटना; चालकासह एकाला अटक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०नागपूर :**

एका ऑडी मोटारीने रविवारी मध्यरात्री शहरात पाच दुचाकी आणि चारचाकी वाहनांना धडक दिली. या घटनेत कुणीही जखमी झाले नसले, तरी वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. याप्रकरणी सीताबर्डी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. विशेष म्हणजे, या मोटारीची नोंदणी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत यांच्या नावाने आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, संकेत यांची मोटार त्यांचा चालक अर्जुन हावरे (२४) आणि रोनित चिंतमवार (२७) यांना चालवायला दिली होती. याच मोटारीने रविवारी मध्यरात्री पाच वाहनांना धडक दिली. अपघातग्रस्त जितेंद्र सोनटक्के (४०) यांनी दिलेल्या तक्रारीवरून सीताबर्डी पोलिसांनी चालक हावरे आणि चिंतमवार यांना अटक केली. पोलिसांनी मोटार जप्त करून पोलीस ठाण्यात आणली. त्यावेळी तिची ‘नंबर प्लेट’ काढण्यात आल्याचे उघड झाले. कार कुणाच्या नावावर आहे, याची माहिती वाहतूक कार्यालयाकडून मागविल्याचे पोलीस अधिकारी चंद्रशेखर चकाटे यांनी सांगितले.



**चालक कोण?**

अपघातावेळी नेमके कार कोण चालवत होते, हे अद्यापही गुलदस्त्यात आहे. संविधान चौकापासून ते सेंट्रल बाजार रोडवरील सीसीटीव्ही फुटेज गायब करण्यात आल्याची चर्चा आहे.

रामदासपेठमध्ये महागड्या ऑडी कारने अनेक गाड्यांना धडक दिली. चंद्रेशखर बावनकुळे यांच्यासाठी कायदा वेगळा आहे का?

**- सुषमा अंधारे, प्रवक्त्या, शिवसेना (उबाठा)**

कार माझ्या मुलाच्या नावावर आहे. पोलिसांनी नि:ष्पक्ष चौकशी करावी. दोषी असतील त्यांच्यावर गुन्हे दाखल व्हावेत. **- चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशाध्यक्ष, भाजप.**


# महानगरपालिकेच्या अन्यायकारक करवाढीला शासनाचा 'स्टे'

## मनपा आयुक्तांनी त्वरित आदेश काढून जनतेला दिलासा द्यावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० अमरावती :** शासनाने अमरावती महानगरपालिकेच्या अन्यायकारक वाढीव कर पुनमूल्यांकन स्थगित करण्याबाबत शासनादेश न काढता केवळ एक पत्र पाठवून अमरावतीकरांच्या डोळ्यात धूळफेक करण्याचा प्रयत्न केला आहे. करवाढीबाबत शासनाने काढलेल्या या पत्रात कोणतीही सुस्पष्टता नसून हे त्रोटक पत्र शासनाकडून केव्हाही सुधारित करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या पत्रानुसार तात्काळ तीन दिवसात आयुक्तानी आपल्या स्तरावरून कर वाढीसंदर्भात आदेश काढून अमरावतीच्या सामान्य जनतेला अन्यायकारक करवाढीपासून मुक्तता द्यावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सुनिल खराटे यांनी मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. अमरावती महानगरपालिकेने अवाढव्य कर आकारणी करून सर्वसामान्यांना आर्थिक संकटात टाकले आहे.

महानगरपालिकेच्या अन्यायकारक वाढीव मालमत्ता कराच्या प्रक्रियेला शासनाने स्थगिती दिल्याचे शासनाच्या उपसचिवाचे पत्राचे अवलोकन केल्यानंतर असे दिसून येते की शासनाने या करवाढीबाबत घेण्यात आलेल्या ठरावाच्या स्थगन किंवा रद्दबाबत कोणतेही भाष्य पत्रात केलेले नाही. याउलट फक्त २०२४ च्या कर पुनर्मूल्यांकन प्रक्रियेला स्थगिती दिल्याचे नमूद असून कर पुनर्मूल्यांकन प्रक्रिया ही मार्च २०२३ पूर्वीच पूर्ण झाली असून आता फक्त कर वसुलीचे काम सुरू आहे. वास्तविक या अन्यायकारक करवाढीच्या स्थगनासाठी किंवा रद्द करण्यासाठी महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या तरतूदचे स्पष्ट उल्लेख करून संबंधित ठरावाला व महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशाला स्थगिती दिल्याबाबतचा शासनादेश काढणे आवश्यक होते.अशा परिस्थितीत मनपा आयुक्तानी या पत्राच्या आधारावर स्पष्ट आदेश काढून वर्ष २०२३-२४ पासून लागू करण्यात आलेले वाढीव कर दर रद्द करण्यात येत असून जुन्या दराने नागरिकांनी कर भरण्याबाबत आदेशित करावे तसेच आजपर्यंत वाढीव करदराने भरण्यात आलेल्या कराबाबत स्पष्ट आदेश करून पुढील वर्षाच्या कर मागणीमध्ये समायोजित करण्यात येईल किंवा नागरिकांनी पूर्वीच्या करापेक्षा जास्तीचे भरलेल्या कर रक्कम परत करण्यात येईल असे उल्लेख करावे व त्याबाबतचे प्रमाणपत्र नागरिकांना देण्यात यावे. याबाबत एखाद्या नागरिकांनी पूर्वीपेक्षा दहापट जास्त दराने कर भरला असल्यास संबंधितांना पुढील दहा वर्ष कर भरण्याची आवश्यकता राहणार नाही अशा पद्धतीचे प्रमाणपत्र द्यावे किंवा त्यांचे अतिरिक्त घेण्यात आली रक्कम परत करण्यात



यावी जेणेकरून या जाचक कर वाढिपासून नागरिकांना मुक्तता मिळेल.त्यामुळे आयुक्तांनी शासनाने कर पुनमूल्यांकनाच्या बाबतीत स्थगित करण्याबाबत दिलेल्या पत्रानुसार तात्काळ तीन दिवसात वरीलप्रमाणे आपल्या स्तरावरून आदेश काढून अमरावतीच्या सामान्य जनतेला अन्यायकारक करवाढी पासून मुक्तता करावी अशा आशयाचे निवेदन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

### शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांची मागणी
### मनपा आयुक्तांना निवेदन सादर



अमरावती महानगरपालिकेने लादलेल्या जाचक कर वाढीसंदर्भात गेल्या वर्षभरापासून आम्ही लढा देत आहोत. याची किंवा उशिरा जाग आलेल्या लोकप्रतिनिदिंच्या प्रयत्नांची दखल घेऊन शासनाला या आदेशाला स्थगिती देणारे पत्र निर्गमित करावे लागले. सर्वसामान्यांच्या हिताच्यादृष्टीने आयुक्तांनी या पत्राची दखल घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात आयुक्तांना निवेदन दिले आहे. त्याची ते तत्काळ दखल घेतील अशी अपेक्षा आहे. अन्यथा पुढील भूमिका ठरवू.

**सुनील खराटे , जिल्हाप्रमुख, शिवसेना अमरावती**

# शिक्षक व्हायचंय? 'टीईटी'चा फॉर्म भरा...; ३० सप्टेंबरपर्यंत मुदत, १० नोव्हेंबरला परीक्षा

## पहिल्या टप्प्याची भरती अंतिम टप्प्यात आहे, तर दुसऱ्या टप्प्यात काही हजार पदे भरली जाण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० मुंबई** – पहिली ते आठवीच्या वर्गांना शिक्षक होण्यासाठी अनिवार्य असलेली शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) राज्य परीक्षा परिषदेतर्फे १० नोव्हेंबर रोजी घेतली जाणार आहे. त्यासाठी ९ ते ३० सप्टेंबर या कालावधीत अर्ज भरता येणार आहे. राज्य परीक्षा परिषदेचे उपायुक्त संजय राठोड यांनी याबाबतची माहिती प्रसिद्धिपत्रका द्वारे दिली. राज्यातील पहिली ते आठवीच्या सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनांच्या अनुदानित, विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षण सेवक, शिक्षक या पदांसाठी उमेदवार टीईटी उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे. राज्यात पवित्र संकेतस्थळाद्वारे शिक्षक भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. पहिल्या टप्प्याची भरती अंतिम टप्प्यात आहे, तर दुसऱ्या टप्प्यात काही हजार पदे भरली जाण्याची शक्यता आहे.

मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या अधीन राहून उमेदवारांना परीक्षेला तात्पुरता प्रवेश देऊन निकाल घोषित केला जाईल. निकालानंतर शैक्षणिक व व्यावसायिक कागदपत्रांची पडताळणी प्रमाणपत्र वितरणावेळी करण्यात येईल. प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी कागदपत्रे अपूर्ण असल्यास किंवा उमेदवार प्रमाणपत्रे सादर करू न शकल्यास परीक्षेची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

खोटी माहिती भरल्यास कारवाई



टीईटी २०१८ आणि २०१९मधील गैरप्रकारात समाविष्ट असलेल्या उमेदवारांची यादी परीक्षा परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रत्येक उमेदवाराने आपले नाव या यादीत आहे किंवा नाही, याबाबत तपासणी करून वस्तुनिष्ठ माहिती अर्जात भरावी.

भरलेली माहिती चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास कोणत्याही स्तरावर संपादणूक रद्द करण्याचा अधिकार परीक्षा परिषदेकडे राहील. २०१८, २०१९च्या गैरप्रकार केलेल्या उमेदवारांच्या यादीत नाव असूनही खोटी माहिती भरून परीक्षा दिल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही नमूद करण्यात आले आहे.

### वेळापत्रक असे...

अर्ज भरण्याचा कालावधी : ९ ते ३० सप्टेंबर
प्रवेशपत्र मिळण्याचा कालावधी : २८ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर
परीक्षेची तारीख : १० नोव्हेंबर
वेळ : पहिला पेपर – सकाळी १०:३० ते १:००
दुसरा पेपर : दुपारी २:०० ते ४:३०

# राज्यातील किमान २५ मतदार संघांमध्ये मैत्रीपूर्ण लढत व्हावी

## भाजप नेत्यांची अमित शहा यांच्या कडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०मुंबई–** भाजप नेते



आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या दोन दिवसीय महाराष्ट्र दौऱ्याची चांगलीच चर्चा झाली. या दौऱ्यादरम्यान राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे सुरुवातीला गैरहजर राहिल्याने तर्क-वितर्क लढवले जात होते. मात्र नंतर अमित शाह हे परतीच्या प्रवासाला निघण्याआधी अजित पवार आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी मुंबई विमानतळावर शाह यांची भेट घेत चर्चा केली. एकीकडे अजित पवारांच्या नाराजीची चर्चा सुरू असतानाच अमित शाह यांच्या दौऱ्याबाबत आता आणखी एक माहिती समोर आली असून महाराष्ट्र भाजपच्या नेत्यांनी शाह यांच्याकडे केलेल्या नव्या मागणीने अजित पवारांसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची डोकेदुखी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महायुतीतील तीन पक्ष पहिल्यांदाच विधानसभा निवडणुकीला एकत्रितपणे सामोरे जात असल्याने जागावाटपाचा तिढा निर्माण झाला आहे. कोणत्या पक्षाने किती जागा लढवायच्या, यावरून सध्या या तीन पक्षांमध्ये रस्सीखेच सुरू असल्याचं चित्र आहे. कारण अनेक मतदारसंघांमध्ये महायुतीतील घटकपक्षांचे एकापेक्षा जास्त इच्छुक उमेदवार आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील किमान २५ मतदारसंघांमध्ये मैत्रीपूर्ण लढत व्हावी, अशी मागणी राज्यातील भाजप नेत्यांनी अमित शाह यांच्याकडे केल्याचे समजते. दरम्यान, राज्यातील भाजप नेत्यांच्या या मागणीला अमित शाह हे सहमती देणार का आणि या प्रस्तावाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पक्ष कसा प्रतिसाद देणार, हे पाहणंही महत्त्वाचं ठरणार आहे.

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री व भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शाह हे मुंबई दौऱ्यावर रविवारीच मुंबईत दाखल झाले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रत्येक ठिकाणी त्यांच्यासोबत होते. पण, अजित पवार न दिसल्याने चर्चा रंगली. शेवटी शाह मुंबईहून रवाना होत असताना अजित पवार विमानतळावर पोहोचले आणि प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरेंसह त्यांनी शाह यांच्याशी चर्चा केली.

### भाजप किती जागांसाठी आग्रही?

आगामी विधानसभा निवडणुकीत पक्षाने किमान १५० जागा लढवाव्यात, यासाठी महाराष्ट्र भाजपमधील नेते आग्रही असल्याचे समजते. तर दुसरीकडे, अजित पवारांच्या राष्ट्रवादीची महायुतीच्या जागावाटपात आपल्या वाट्याला किमान ७० जागा याव्यात, अशी अपेक्षा असल्याची माहिती आहे. त्यामुळे आगामी काळात महायुतीच्या जागावाटपात कोणत्या पक्षाला किती जागा मिळतात, हे पाहावं लागेल.

# जीवघेण्या खड्ड्याविरोधात शिवसेनेचे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अंजनगावसुर्जी**

नवीन बस स्थानक परिसरात असलेल्या एका खाजगी मालकीच्या भूखंडावर २०२२ पासुन निर्मानाधीन व्यापारी संकुलाचे बाधकामाचे उद्देशाने जागामालक व विकासकाने विस फुट खड्डा खोदुन ठेवला.सदर काम पेंडींग पडल्याने परीसरातील सांडपाणी व पावसाचे पाणी खड्ड्यात साचुन राहल्याने नागरिकांची जिवीतास धोका निर्माण झाल्याने गत दोन वर्षीपासुन विकासकाने व नगरपरिषदने अनेकदा निवेदने देऊनही दखल घेतली नसल्याने अखेर या जिवघेन्या खड्ड्या विरोधात शिवसेना शहरप्रमुख मुन्ना ईसोकार व तालुका प्रमुख नितीन चौखंडे यांनी पंधरा ते वीस फूट पाणी भरलेल्या खड्ड्यात उतरुन सोमवारी उपोषण सुरू केले होते त्यानंतर नगर पालिकेच्या वतीने या परिस्थितीला जबाबदार असलेल्यांवर तिन दिवसात गुन्हे दाखल करण्याचे आणि पाऊस थांबल्यानंतर खड्डा बुजविण्याचे आश्वासन दिल्यावर उपोषण सुटले.नविन बसस्थानक परिसरातील एका खाजगी जागा मालकाने व्यापारी संकुल



बांधण्याच्या हेतूने खोदलेल्या विस फुट खोल जिवघेना खड्डा त्याचेआजुबाजुस निवासी रहीवासियांच्या तथा व्यावसायिकांचे प्रतिष्ठानच्या जिवावर उठला असताना.सदर खड्डा खोदुन ठेवल्यावर काम बंद पडल्याने तब्बल दोन वर्षापासुन त्यात पाणी साचुन त्याला तलावाचे स्वरुप आले असल्याने या मुरत असलेल्या पाण्यामुळे व्यापाऱ्यांची दुकाने पायापर्यत उघडी पडली आहेत तसेच घान पाण्यामुळे आजुबाजुंच्या परीसरात विषारी सापांच्या सुळसुळाटासह डासांच्या प्रकोप झाला असुन नागरिकांच्या आरोग्यासह जिवीताचा प्रश्न निर्माण झाल्याने सदर खड्ड्या बाबत विकासक व नगरपरिषद यांचेशी अनेकदा चर्चा झाली. तसे निवेदनही दिले परंतु पालीका प्रशासनाला जाग न आल्यामुळे आणि सहा सप्टेंबर ला निवेदन देउन खड्ड्यात उतरुण आमरण उपोषण करण्याचा इशारा देऊन सुद्धा कारवाही न झाल्याने अखेर शिवसेना शहर प्रमुख मुन्ना इसोकार व नितीन चौखंडे यांनी सोमवारी (ता०९) खड्ड्यात उतरुण आमरण उपोषण सुरु केले होते तेव्हा मुख्याधिकर्यानी तिन दिवसात संबधित व्यावसायीकावर गुन्हे दाखल करण्याचे व पाऊस थांबल्यानंतर खड्डा बुजवण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी उपोषण मागे घेतले.यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल अरबट, सह संपर्कप्रमुख रवी गणोरकर ,तालूका प्रमुख दर्यापुर महेंद्र भांडे, गणेश गावंडे,गजू पाटील,शाम पाटील अनील राऊत,आमोल फाटे,रामकृष्ण वानखडे,जिवन कराळे,बाला फुलंबरकर,विष्णु फाटे,प्रकाश फाटे,निवाने यांची उपस्थिती होती.

# सरपंचपदाच्या भांडणात बँक खातेबदल करण्याचा ठराव नामंजूर

**वाढोणा रामनाथ :** स्थानिक ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांचे पगार झालेले नाहीत. कारण गावगाड्याच्या राजकारणात सरपंचाच्या नावे बँक खातेबदल करण्याचा ठराव नामंजूर झाला. दोन महिन्यांपूर्वीच पदावर विराजमान झालेल्या सरपंचाच्या गोटात पाच, तर विरोधात सहा सदस्य आहेत.नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील वाढोण्याच्या सरपंचपदी दोन महिन्यांपूर्वी सविता तिरमारे यांची निवड झाली. तेव्हापासून बँक खातेबदल रखडला. त्यामुळे गावातील संपूर्ण विकासकामे थांबली आहेत. ग्रामपंचायतमध्ये एकूण अकरा सदस्य आहे.

त्यापैकी पाच सदस्य सरपंच तिरमारे यांच्याकडे, तर सहा सदस्य विरोधात आहेत. ग्रामपंचायतीच्या मासिक सभेमध्ये बँक खातेबदल करण्यासाठी ठराव नामंजूर करण्यात आला. त्यामुळे ग्रामविकास अधिकारी वाघोडे यांनी तसा अहवाल गटविकास अधिकाऱ्यांकडे पाठविला. पंचायत समितीने जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव पाठविला. परंतु, आजपर्यंत त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही.

त्यातच कर्मचाऱ्यांचे पगारसुद्धा झाले नाही. सरपंचांना पैसे खर्च करण्याचे अधिकार नाहीत. वाढोण्यात गेल्या तीन वर्षांपासून सरपंचपदासाठी न्यायालयीन वाद झडत आहेत. तो अजूनही थांबला नाही. जिल्हा परिषद यावर कुठली कायदेशीर कारवाई करणार, याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव आला आहे. तो जिल्हा परिषदेकडे पाठविला आहे. लवकरच कारवाई होईल.

**– संजय झंजाड गटविकास अधिकारी, नांदगाव खंडेश्वर**

# मोकाट जनावरे पकडण्याच्या कारवाईला सुरुवात; ४००जनावरे ताब्यातपशुपालकांकडून दीड लाखांचा दंड वसूल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० अमरावती–** गेल्या कित्येक दिवसांपासून कुंभकर्णी झोपेत असलेला महापालिकेचा पशू संवर्धन विभाग अपघाताच्या घटनेनंतर व नागरिकांनी महापालिके विरुद्ध आक्रमक भूमिका घेतल्यानंतर काहीसा जागा झालेला आहे. महापालिकेच्या पशूवैद्यकीय विभागाने यासंदर्भात मोहिम राबवित शहरातील मोकाट सुमारे ३०० ते ४०० जनावरे पकडली तसेच पशूपालकांकडून दीड लाखांचा दंड वसूल केला आहे.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये पशुपालकांनी त्यांची जनावरे नियमानुसार पाळावी तसेच मोकाट स्वरूपात सोडू नये, याबाबत स्वास्थ निरीक्षक, पशुवैद्यकीय विभागामार्फत नागरिकांना झोननिहाय नोटिस देण्याची खानापूर्ती केलेली होती.



त्यावर मात्र कुठलिच कार्यवाही केलेली नाही. परिणामी पशुपालकांमार्फत त्या कार्यवाहीला कुठलाच प्रतिसाद मिळाला नाही.दरम्यान मोकाट जनावरांच्या हैदोसाने बाळासाहेब महल्ले यांचा बळी घेतला.

त्यानंतर आता महापालिके ने वरातीमागून घोडे दामटविण्याचा प्रयत्न सुरू केला. पशुवैद्यकीय विभागाने कारवाईस सुरुवात केलेली आहे. या कारवाईदरम्यान पशूपालकांकडून दीड लाख रुपये दंड वसूल करण्यात आला.या मोहिमेदरम्यान अनधिकृत पशुपालकांकडील २० ट्रक शेणखत उचलण्यात आले. ज्या ठिकाणी जनावर मालकांनी अतिक्रमण करून गोठे तयार केले होते, अशी गवळीपुरा, कल्याणनगर, सबनीसप्लॉट, प्रसाद कॉलनी, मोतीनगर, किरण नगर, पठाण चौक, चपराशिपुरा, सौदागरपुरा या

ठिकाणची गोठे तोडण्यात आलेत. कारवाईदरम्यान ज्या नागरिकांनी अडथळा आणण्याचा प्रयत्न केला, त्यांच्यावर आयुक्तांच्या परवानगीने गुन्हे दाखल केले जाणार आहेत.तडकाफडकीच्या कार्यवाहीदरम्यान सहाय्यक आयुक्त, पशुवैद्यकीय अधिकारी, स्वच्छता अधिकारी, अतिक्रमण विभाग, यांचे कर्मचारी कार्यरत असून पंधरा ते वीस जनावरे जप्त करण्यात आली. पकडलेली जनावरे सोडण्यात येणार नाहीत. मनपा आयुक्तांच्या परवानगीशिवाय ताब्यात घेतलेली जनावरे सोडली जाणार नसल्याचे महापालिका प्रशासनाने म्हटले आहे.


!! Shree Gajanana Maharaj Prasanna !!

**P. R. Pote Patil**
**College of Engineering & Management**
(An Autonomous Institutes)
Pote Estate, Pote Patil Road, Amravati

(Approved by AICTE, New Delhi & Affiliated to Sant Gadge Baba Amravati University)
Contact no. – (0721) 2970110, Website - www.prpotepatilengg.ac.in

**VACANCY ROUND 2024-25**

Vacancies After CAP Round & IL Quota to First Year & Direct Second Year 2024-25

Applications are invited from the eligible candidates for admissions against vacant seats after CAP round & IL Quota

U.G. (B.Tech.) 1) Computer Sci. & Engg. 2) Electronics & Teleco. Engg.
3) Electrical Engineering 4) Civil Engineering
5) Mechanical Engineering 6) Artificial Intelligence & Data Science
7) Computer Sci. & Engg (Artificial Intelligence & Machine Learning)

NOTE :- Admission Schedule will be display on our Notice Board & Institute Website. Principal

# भूमिपूजन थाटात,रस्ता मात्र गटारात

## शेकडो नागरिक आपल्या समस्या घेऊन नितीन कदम यांच्यासमोर एकवटले



वीज, पाणी, स्वच्छता, रस्ते व ईतर मूलभूत सुविधाअभावी येथील नागरिक मोठ्या जोखमीने येथे वास्तव्यात आहेत. वारंवार तक्रारी, निवेदने देवूनही लोकप्रतिनिधी व प्रशासन लक्ष देत नसेल तर जनसामान्यांनी दाद कुणाला मांगावी. यावर प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास संकल्प व नागरीकांच्या रोषाला सामोरे जाण्याची तयारी करावी.

**नितीन कदम**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

लक्षावधी रुपयांचा निधी आणून विकास केल्याचा गाजावाजा विद्यमान आमदारांकडून मोठ्या प्रमाणात केला जात आहे. मात्र, प्रत्यक्षात उंटावरुन शेळ्या हाकणे, अशी परिस्थिति निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे. बडनेरा विधानसभा क्षेत्रातील महादेव खोरी परिसरातून मुख्य रस्त्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन विद्यमान आमदारांच्या हस्ते काही महिन्यापूर्वी महिन्यांपूर्वी झाले. मात्र, भूमीपूजनाचा फलक लावण्यापलीकडे अजून काहीही झालेले नसल्याने परिसरातील नागरिकांत तीव्र संताप आहे. त्यामुळे मुख्य रस्त्याकडे जाण्याचा मार्ग खडतर बनला आहेमहादेव खोरी परिसरातील शेवटच्या चौकपासून तर मुख्य रस्त्यापर्यंत परिस्थिति बिकट आहे. पावसाळ्यात या रस्त्याला तळ्याचे स्वरूप निर्माण होते. त्यामुळे या लगतच्या परीसारसह मुलांच्या शिक्षणावर अडथळा निर्माण होतो. नोकरी-व्यवसायानिमित्त जाणाऱ्या नागरिकांचेदेखील प्रचंड हाल होतात. जिल्हा नियोजन निधी अंतर्गत लक्षावधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. लोकसभा निवडणुकीच्या आधी या रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन विद्यमान आमदार राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्याचे फलक देखील लावण्यात आले आहे. मोठा गाजावाजा करीत या रस्त्याच्या कामाचा भूमीपूजन सोहळा करण्यात आला. परंतु, अनेक महिने उलटून या रस्त्याच्या बांधकामात एक दगडही पडलेला नाही, त्यामुळे हा रस्त्या केव्हा पूर्ण होणार, असा प्रश्न नागरिकांचा आहे.सदर भागात फक्त विकासकामांचे फलक लावून विकास शून्य असल्याचे दिसून येत आहे. यावर प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन तातडीने रस्ते, वीज, स्वच्छता व ईतर मूलभूत प्रश्नांवर तातडीने लक्ष देण्याचे आवाहन नितीन कदम यांनी प्रशासनाला करून लोकप्रतिनिधींना चांगलेच धारेवर धरले आहे.

# स्वच्छ वायु सर्वेक्षण अमरावतीचा व्दितीय क्रमांक

## ५० लाखांचे मिळाले बक्षीस : आयुक्तांनी केला सत्कार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

संपूर्ण भारतामध्ये नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम (एनसीएपी) अंतर्गत घेण्यात आलेल्या स्वच्छ वायू सर्वेक्षण स्पर्धेत सन २०२३-२४ मधील इर्शीी झशीषेीा-ळपस उळींळशी या अंतर्गत सीपीसीबीने केलेल्या सर्वेक्षणानुसार, भारत सरकारच्या पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालयामार्फत तीन लाख ते दहा लाख लोकसंख्येच्या कॅटेगरी मधील व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक अमरावती महानगरपालिकेस जाहीर झाले होते.

एनसीएपी (नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम) अंतर्गत घेण्यात आलेल्या स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२३-२४ स्पर्धेत ३ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात अमरावती शहराने भारतातून व्दितीय क्रमांक पटकावला आहे. यासाठी अमरावती महानगरपालिकेला ५० लाख रुपयांचा पुरस्कार मिळाला.स्वच्छ वायू सर्वेक्षणांतर्गत हवा शुद्ध ठेवण्यासाठी उत्कृष्ट प्रयत्न करणाऱ्या शहरांमध्ये केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने गोळा केलेल्या आकडेवारीनुसार केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालयाने पुरस्काराची घोषणा केली होती.या बक्षिसामुळे अर्थातच महानगरपालिका अमरावती कडून भविष्यात पर्यावरणाच्या संवर्धनाच्या दृष्टीने आणखी चांगले कार्य करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. मा.आयुक्त सचिन कलंत्रे यांनी घेतलेल्या परिश्रमामुळे अमरावती महानगरपालिकेला मोठे यश प्राप्त झाले आहे. या स्वच्छ वायु सर्वेक्षण स्पर्धेत अमरावती महानगरपालिकेला व्दितीय क्रमांकाचे बक्षिस मिळाल्याबद्दल महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी व अमरावतीकर नागरिकांचे अभिनंदन केले आहे.यावेळी महानगरपालिकेतील अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख तसेच सर्व अधिकारी कर्मचा-यांच्या सांघिक प्रयत्नांचा तो परिपाक असल्याने महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी स्वच्छ वायू सर्वेक्षण स्पर्धेत अमरावती शहराने व्दितीय क्रमांक पटकाविल्याबद्दल महानगरपालिकेतील संबंधीत सर्व अधिका-यांचा सत्कार केला. यावेळी उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, दिप्ती गायकवाड, धनंजय शिंदे, सुभाष जानोरे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, उद्यान अधिक्षक श्रीकांत गिरी, बाजार व परवाना अधिक्षक उदय चव्हाण, सहाय्यक नगर रचनाकार कांचन भावे, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, उपअभियंता (प्रकल्प) सुहास चव्हाण, स्वास्थ अधिक्षक श्रीकांत डवरे, उपअभियंता श्यामकांत टोपरे, प्रमोद इंगोले, श्रीरंग तायडे, विवेक देशमुख, कार्यशाळा उपअभियंता स्वप्निल जसवंते, संदिप वडुरकर, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# अर्ज करूनही 'आरटीई'मध्ये अद्यापही प्रवेश मिळाला नसेल तर हे करा, शेवटची संधी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क अधिनियमानुसार दुर्बल व वंचित घटकातील बालकांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा, खाजगी विनाअनुदानित व खाजगी कायम विनाअनुदानित शाळांमध्ये (अल्पसंख्याक शाळा वगळून) २५ टक्के प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत ७३ हजार ६१२ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असून, अद्याप ३१ हजारांहून अधिक जागा रिक्त असल्याचे दिसून येत आहे. सुरुवातीला २३ ते ३१ जुलै या कालावधीत प्रवेशासाठी संधी दिल्यानंतर आणखी दोनवेळा मुदतवाढ देण्यात आली होती. सोडतीद्वारे प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांनंतर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दोन फेऱ्या राबवण्यात आल्या. त्यानंतरही जागा रिक्त असल्याने आता अर्जदारांना संधी कशी मिळेल, त्यासाठी काय कराल याविषयी सविस्तर माहिती जाणून घ्या.

**अशी राहणार तिसरी फेरी**

प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यंदा राज्यातील ९ हजार २१७ शाळांमध्ये १ लाख ५ हजार २४२ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी दाखल झालेल्या २ लाख ४२ हजार ५१६ अर्जांतून ९३ हजार ९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. प्रतीक्षा यादीत ७१ हजार २७६ विद्यार्थ्यांचा समावेश होता. प्रतीक्षा यादीतील तिसऱ्या फेरीतील बालकांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी पालकांनी १२ सप्टेंबरपर्यंत तालुका पडताळणी समितीकडे संपूर्ण कागदपत्रासह प्रत्यक्ष संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# माता बनल्या अंगणवाडी ताई..... मुलांना शिकवली अ आ इ ई..

## राष्ट्रीय पोषण महा निमित्त महिनाभर विविध कार्यक्रमांची मेजवानी : संजीता महापात्र



महिला बाल विकास विभागाने राष्ट्रीय पोषण महा निमित्त अतिशय सुंदर अशा कार्यक्रमाचे नियोजन केलेल आहे अंगणवाडी ताईंच्या मार्फत सदर कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येणार असून गावातील पालक, युवक, स्वयंसेवी संस्था, शाळा, महाविद्यालय यांनी सुद्धा या कार्यक्रमात सहभागी होऊन राष्ट्रीय पोषण विवाह थाटामाटात साजरा करावा.

**संजीता महापात्र,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ भातकुली**

राष्ट्रीय पोषण महा निमित्त महिला बाल विकास विभागामार्फत संपूर्ण महिनाभर वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येतात. यावर्षी सुद्धा महिला बालविकास विभागामार्फत वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारला माता बनल्या अंगणवाडी ताई मुलांना शिकवली अ आ इ ई..... या उपक्रमांतर्गत गावातील मातांनी अंगणवाडी केंद्रात जाऊन बालकांसोबत संवाद साधला, काही मातांनी बालकांना गाणी शिकवली, काहींनी मातीकाम शिकवले, काहींनी लिहायला शिकवले तर काहींनी वाचायला शिकवले त्यामुळे मुलांना वेगळ्या अंगणवाडी ताई भेटल्यांचा आनंद झाला.

यावर्षी प्रामुख्याने राष्ट्रीय पोषण महा निमित्त अनेमिया कमी करणे, बालकांची वजन वाढ मोजणे, बालकांना योग्य तो आहार खाऊ घालने, पोषण भी और पढाई भी, तंत्रज्ञानाची ओळख आणि सर्वांगीण पोषण या महत्त्वाच्या बाबीवर राष्ट्रीय पोषणमांचे उपक्रम राबवले जाणार असून या अंतर्गत महिला बालविकास विभाग अमरावती नेआपल्या महिनाभराच्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये एक पेड मा के नाम, १००० दिवस उपास बंद चळवळ, हाट बाजार, इलेक्ट्रॉनिक उपवास, अक्षय पात्र आणि मटका फ्रिज, मातांची पाककृती स्पर्धा, अन्नसाक्षरता, एक दिवस मेळघाटासाठी, माता बालक संयुक्त योगा, मासिक पाळी व्यवस्थापन काळाची गरज, पोषणावर बोलू काही, लोकप्रतिनिधी दिवस, वृद्धांचे वाढदिवस, नवविवाहितांचे समुपदेशन, आजीबाईंची अंगणवाडी अशा विविध कार्यक्रमांचे सूक्ष्म नियोजन डॉ. कैलास घोडके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले असून संपूर्ण महिनाभर या कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

मंगळवार ला राबवण्यात आलेल्या उपक्रमात अंगणवाडी ताई ऐवजी गावातील मातांनी अंगणवाडी ताई म्हणून मुलांना शिकवल्यामुळे मुलांच्या चेहऱ्यावर एक वेगळा आनंद दिसून येत होता. त्याचबरोबर नवीन बाबी शिकायला मिळाल्यामुळे मुले उत्साहात होती. काही मातांनी मुलांना खाऊही आणला होता ज्यामुळे मुलांना आणखी आनंद झाला. राष्ट्रीय पोषण महानिमित्त जे वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येतील त्यामध्ये पालकांनी सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. कैलास घोडके उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

# श्री.गजानन स्वयंप्रेरीत सेवासंस्था अमरावतीचा स्तुत्य उपक्रम

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उत्तमसरा येथिल विद्यार्थांना स्कूल बॅग व मातांना साडीचे वाटप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

पंचायत समिती भातकुली मधिल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उत्तमसरा येथे श्री.गजानन स्वयंप्रेरीत सेवासंस्था अमरावतीच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थांना स्कूल बॅग व विद्यार्थीनीच्या मातांना साड्यांचे वाटप सोमवार दि.९सप्टेंबरला करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उत्तमसराचे सरपंच धर्मेंद्र मेहरे होते तर प्रमुख अतिथी माजी खासदार अनंत गुढे,संस्थेचे पिंजरकर सर,नरेंद्र उमेकर,अनिल वानखडे, देविदास कोल्हे, प्रा.अरविंद लोखंडे,विष्णूपंत कांबे, म.न.पा.माजी शिक्षणाधिकारी सविता चक्रपाणी, केंद्र प्रमुख निता सोमवंशी,शाळा व्यवस्थापण समितीचे अध्यक्ष कैलास रंगारी,उपाध्यक्ष सविता जुनघरे,जि.प.शाळा हायस्कृलचे मुख्याध्यापक लोमेश खैरकर, संतोष कुर्हेकर, शाळेच्या मुख्याध्यापीका मिनांक्षी इंगळे, स.शिक्षक गजानन येलोने,राजेश सावरकर,सुनिता अकर्ते,प्रमोद कांबळे,एकता शेवतकर,प्राजक्ता वर्हेकर,अर्पणा झाडे उपस्थित होत्या.पाहुण्यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन हारार्पण करण्यात आले.यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थांना स्कूल बॅगचे व मुलिंच्या मातांना साडीचे वाटप करण्यात आले. या वेळी माजी खाजदार अनंतराव गुढे यांनी मार्गदर्शन करतांना म्हणाले जि.प.शाळेत शिकणारी मुले ही गरीब,गरजु,शेतकरी,कंष्टकरी यांची आहे.या करीता हया शाळा टिकल्या पाहीजे या करीता समाजातील दानशुर व्यक्तींनी शाळांना वारंवार मदत केली पाहीजे.श्री.गजानन स्वयंप्रेरीत सेवासंस्था अमरावतीचे खरोखरच स्तृत्य उपक्रम राबवते ते गरजुना मदत करते.संस्थेच्या पदाधिकारी यांचे अभिनंदन. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मिनांक्षी इंगळे यांनी तर सुत्र संचालन गजानन येलोने व आभार राजेश सावरकर यांनी मानले. कार्यक्रमाला शाळेचे विद्यार्थी, पालक,माता मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# मंदाकिनी निमकर सत्यशोधक पुरस्काराने सन्मानित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

महाराष्ट्र सरकारच्या परिपत्रकानुसार सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनी महात्मा फुले विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय मुधोळकर पेठ येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी महात्मा फुले शिक्षण समितीच्या अध्यक्षा माजी प्राचार्य मंदाकिनी वसंतराव निमकर यांचा महात्मा फुले सत्यशोधक पुरस्काराने गौरविण्यात आले. हा पुरस्कार वऱ्हाड विकास मंच, फुले शाहू आंबेडकरी संघटना यांच्यातर्फे प्राध्यापक श्रीकृष्ण बनसोड यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी मंदाकिनी निमकर यांचा पुष्प गुच्छ,सन्मानपत्र व महात्मा फुले सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा भेट देऊन गौरव करण्यात आला.यावेळी मंदाकिनी निमकर यांनी मुलींनी सबलीकरण सक्षमीकरण व आत्मसंरक्षण करण्याची गरज व्यक्त केली. सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांचे विचार हे येणाऱ्या पिढीसाठी उपयुक्त ठरणार असल्याच प्रतिपादन देखील यावेळी मंदाकिनी निमकर यांनी केले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांनी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या क्रांतिकार्यावर प्रकाश टाकत चक्रधर स्वामी यांचे समतावादी व मानवतावादी तत्त्वज्ञान आचरणात आणण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव माजी प्राचार्य रमेश पवार, सहसचिव प्रा. किशोर श्रीखंडे,डॉ जयंत पवार, प्राचार्य मंगेश गोरडे, उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य मंगेश गोरडे यांनी तर आभार प्रदर्शन जयश्री आडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गजानन पोटदुखे, अमोल इंगळे,मावसकर,मिलिंद बेलसरे, किसन चव्हाण,राजेश ढेवले यांनी परिश्रम घेतले.

# अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे जेष्ठ प्रचारक बळवंत येरपुडे यांचे निधन

## अखिल भारतीय श्री गुरूदेव सेवामंडळचा एक तारा निखळला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० गुरुकुंज मोझरी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सहकारी बळवंत येरपुडे यांचे वयाच्या ८५ व्यावर्षी आज निधन झाले .१० वर्ष ते रामटेक नगरपरिषदेचे नगराध्यक्ष होते.माजी पंतप्रधान नरसिंह राव यांच्यासोबत त्यांचे निकटचे संबंध होते.निवड मंडळाचे अध्यक्ष म्हणून सुद्धा त्यांनी काम पाहिले.गुरुदेव विद्यामंदिरात काही काळ शिक्षक म्हणून त्यांनी नोकरी केली होती. श्रीगुरुदेव प्रकाशन विभाग प्रमुख असतांना त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या



साहित्याचा प्रसार व प्रचार व्यापक प्रमाणात केला. ते गेल्या काही वर्षापासून गुरुकुंज आश्रमात वास्तव्य करीत होते त्यांच्या पार्थिव देहावर अंतिम संस्कार रामटेक येथे होणार आहे त्यांच्या निधनामुळे गुरुदेव परिवारात शोकमग्न वातावरण आहे.

# आली गौराई अंगणी, तिला लिंबलोण करा! आज घरोघरी माहेरवाशीण गौराईचे आगमन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

माहेरपणासाठी येणाऱ्या गौराईचे म्हणजेच गौरीचे लिंबलोण उतरवून स्वागत केले जाते. आपल्या घरी येणाऱ्या पाहुण्याचे असे स्वागत करण्याची परंपरा आहे. विशेषतः घरी येणारी पाहुणी जर माहेरवाशीण असेल, तर तिचे कौतुकही खास वेगळेच.

माहेरी येणाऱ्या गौरीचे म्हणजेच देवी पार्वतीचे स्वागत कौतुकाने, उत्साहाने केले जाते. आज गौरींचे घरोघरी आगमन होत आहे. गणेशाचे आगमन झाल्यानंतर लगेचच गौरींचा सण येतो. भाद्रपद शुद्ध पक्षाच्या ज्येष्ठ नक्षत्रावर गौरींचे पूजन केले जाते म्हणून त्यांना ज्येष्ठागौरी असेही म्हटले जाते. गौरींचे अनुराधा नक्षत्रावर आवाहन, ज्येष्ठ नक्षत्रावर पूजन आणि मूळ नक्षत्रावर विसर्जन केले जाते. म्हणजेच आदल्या दिवशी संध्याकाळी गौरी आणल्या जातात, दुसऱ्या दिवशी पूजन आणि तिसऱ्या दिवशी विसर्जन केले जाते.

**खरेदीसाठी महिलांची गर्दी**

महिलांनी गौरीचा मुखवटा, आभूषणे, विविध प्रकारची फळे, फुले खरेदी करण्यासाठी महिलांनी बाजारात गर्दी केली होती. पूजेचे साहित्य, फराळ, मिठाई आणि इतर साहित्यांची जुळवाजुळव करणे आणि गौरी आगमनाच्या सजावटीत महिलावर्ग व्यस्त आहे.

**गौरी नटली इमिटेशन ज्वेलरीने**

गौरींसाठी इमिटेशन ज्वेलरी खरेदीकडे महिलांचा कल दिसून आला. गणेशोत्सवात सोन्याचे दागिने वापरण्याची परंपरा लोप वापत असतानाच यंदा महिलांनी मोठ्या प्रमाणात इमिटेशन दागिने खरेदी केल्याने हा बदल अधोरेखित झाल्याचे नीता म्हात्रे या व्यावसायिकानी सांगितले.


# ई-पीक पाहणी नोंद करण्याची जबाबदारी आता पोलिस पाटलांकडे

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

राज्य शासनाने ई-पीक पाण्याची नोंद ऑनलाइनचा निर्णय घेतला आहे. वास्तविक शेतकऱ्यांनी आपल्या शिवारात जाऊन ही माहिती ऑनलाइन भरणे अपेक्षित होते. त्यांना तलाठी, कोतवाल यांनी मदत करायची होती.मात्र, अनेक शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाइल नाहीत, माहिती भरण्याबाबत अज्ञान आहे. त्यातही सर्व्हर डाऊनमुळे काम न करणे हे कामच होत नाही. आता कोतवालांचा संप असल्याने हे काम ठप्प आहे.

'ई-पीक' पाहणी पोलिसपाटलांकडे



खरीप हंगाम संपत आला तरी पीक पाण्याचा अधिकृत आकडा शासनपातळीवर उपलब्ध नाही. त्यामुळे हे काम करून घेण्याची जबाबदारी कामगार पोलिसपाटील, धान्य दुकानदार, ग्रामपंचायत ऑपरेटर यांच्यावर या कामाची धुरा सोपवली.

**किचकट प्रक्रिया अन् दमछाक**

जुन्या पोलिसपाटील यांना मोबाइल हाताळता येत नाही. त्यातच मोठ्या गावात हजारहून अधिक खातेदार आहेत. त्यामुळे ई-पीकची प्रक्रिया करताना जुन्या पोलिसपाटील यांची दमछाक होत आहे. त्यामुळे अनेकांनी आपल्या मुलांनाही या कामात गुंतविले आहे.

**सणासुदीच्या काळात 'पाटील' शिवारात**

सध्या गणेशोत्सवाची धामधूम सुरू आहे. या काळात स्थानिक पातळीवर कायदा सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसपाटील यांच्यावर असते. आता हे मूळ काम सोडून 'पाटील' शिवारात फिरू लागले आहेत.

**बिनपगारी, फुल अधिकारी**

पोलिसपाटील हे तसे जबाबदारीचे व मानाचे पद आहे; पण सर्वांत कमी मानधन पोलिसपाटलांना आहे. मध्यंतरी शासनाने मानधनात वाढ केली. एप्रिल वगळता अजून मानधनच मिळालेले नाही. पोलिसपाटलांचे काम म्हणजे बिनपगारी आणि फुल अधिकारी अशीच अवस्था झाली आहे.

# अंजनगावात स्किल इंडियाचा लोगो वापरून बोगस भरती?

## पोलिसांकडून दोघांची चौकशी, उगाचच झंझट नको म्हणून फिर्यादीने परत घेतली लेखी तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अंजनगाव सुर्जी :**

स्थानिक श्रीनाथ विद्यालयात सोमवारी दुपारी सुरक्षा कर्मचारी व सुपरवायझर भरतीच्या नावाखाली बोलाविलेल्या शेकडो युवकांकडून शंभर रुपये प्रवेश शुल्क वसूल करणाऱ्या नदीम आणि शिवनाथ या दोघांची स्थानिक पोलिसांनी चौकशी केली. मात्र, या प्रकरणाची पोलिसांत लेखी तक्रार करणाऱ्या राजकीय पदाधिकाऱ्याने ती तक्रार मागे घेतल्याने वादावर पडदा पडला.

तक्रारीनुसार ९ ते १२ सप्टेंबरदरम्यान कॅपिटल सिक्युरिटी संकेतस्थळाच्या नावाने कोणताही पत्ता न देता सुरक्षा जवानांच्या भरतीची जाहिरात स्थानिक मीडियात झळकली. भारत कौशल्य विकास योजना असे नाव या जाहिराती दिली. भरतीत सहभागी होणाऱ्या तरुण, तरुणींना नाशिक पोलिस दलात नोकरी देण्याची बतावणी करण्यात आली. याबाबत प्रशासनाला कुठलीही माहिती नाही. आयोजक बेरोजगार युवकांकडून गेटवरच शंभर रुपये व नोंदणी फी साडेतीनशे रुपये वसूल करीत होते आणि त्यांना शिस्तीसाठी छडीचे फटकेसुद्धा मारीत होते. आलेल्या बहुतांश युवकांना या आयोजकांनी घेतलेली रक्कम तक्रारीनंतर पोलिस स्टेशन आवारात परत केली. यावरून ही भरतीप्रक्रिया केवळ बनाव असून, युवकांकडून पैसे उकळण्यासाठी राबविण्याचा आरोप करण्यात आला. मात्र त्यानंतर तक्रारकर्ता पदाधिकारी बॅकफूटवर आल्याने मुसळ केरात गेले.

# ३.६५ लाख शेतकऱ्यांना आजपासून अर्थसहाय्य; हेक्टरी पाच हजारांची मदत

## पोर्टल सुरू; कपाशी, सोयाबीनला शासनाची मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

गतवर्षीच्या कपाशी व सोयाबीनला दोन हेक्टर मर्यादेत हेक्टरी पाच हजारांची मदत मंगळवारपासून (दि. १०) देण्यात येणार आहे. यासाठी पोर्टल सुरू करण्यात आले व कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील ३.६५ लाख शेतकऱ्यांना अधिकतम २० हजारांची शासन मदत मिळू शकते.

गतवर्षी सोयाबीन व कापसाला हमी भावदेखील मिळालेला नाही. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणीद्वारे ऑनलाइन पीक पेरा नोंदविलेला आहे, अशा शेतकऱ्यांना शासन मदत देण्याची घोषणा अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्र्यांनी केली होती. त्यानंतर जमाबंदी विभागाने शेतकऱ्यांच्या याद्या कृषी विभागाला पुरविल्या. यामध्ये अनेक शेतकऱ्यांची नावे गहाळ असल्याने पुरवणी यादी पाठविण्यात आली. त्यामध्येदेखील काही गावे व शेतकऱ्यांची नावे नाहीत.

दरम्यान, परळी येथील कृषी महोत्सवात मुख्यमंत्री यांनी सरसकट शेतकऱ्यांना मदत देण्याची ग्वाही दिली होती. आता योजनेची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली. त्यामध्ये सरसकट उल्लेख नाही. त्याऐवजी ई- पीक पाहणी केलेले शेतकरी यांची माहिती पडताळणी करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना त्यांचा आधार क्रमांक, मोबाइल क्रमांक, संमतीपत्र, संयुक्त खातेदारांचे अफिडेविट कृषी सहायकाला द्यावे लागेल. त्यानंतर तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे कागदपत्र जातील, या माहितीद्वारे आधार प्रमाणीकरण होणार आहे.



**संयुक्त खातेदारांचे हवे अफिडेव्हिट**

संयुक्त खातेदार नाहरकत प्रमाणपत्रावर इतर सह हिस्सेदारांच्या स्वतःच सह्या करीत आहे. एकापेक्षा अधिक खातेदार सर्वांच्या सह्यांचे नाहरकत प्रमाणपत्र आणून देत असल्याने रक्कम कोणाच्या खात्यावर जमा करावी, याचा पेच निर्माण होत आहे. त्यामुळे सर्व सह हिस्सेदारांच्या स्वाक्षरीचे अफिडेविट हे ज्याच्या खात्यात रक्कम जमा करावयाची आहे, त्याला कृषी विभागाकडे सादर करावे लागेल.

**प्राप्त यादीमधील तालुकानिहाय शेतकरी**

| तालुका | कपाशी | सोयाबीन |
|---|---|---|
| अचलपूर | ११३८० | ८७९२ |
| अमरावती | ६०२८ | २२६७१ |
| अंजनगाव सु. | १५७०६ | १५९९५ |
| भातकुली | ८६६३ | २५८४६ |
| चांदूर रेल्वे | ४४५७ | १८३६४ |
| चांदूर बाजार | १२४१० | १४६४५ |
| चिखलदरा | ३०५१ | ८५१२ |
| दर्यापूर | २५१०१ | १५०४० |
| धामणगाव | ११५८८ | १२४२१ |
| धारणी | ८१३९ | ५८१४ |
| मोर्शी | १८८३९ | १४९५८ |
| नांदगाव खं. | ४४०४ | २७०४५ |
| तिवसा | ९०५४ | १६०८८ |
| वरूड | १७९८७ | २१०२ |
| **एकूण** | **१,५६,८०७** | **२,०८,२९३** |

### हे गजानना गणराया सुखी ठेव.....



आमदार रवी राणा व खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी आज गंगा सावित्री निवासस्थानी गणपतीची आरती करून राज्यात पुन्हा महायुती सरकार यावे,शेतकरी शेतमजूर,लाडक्या बहिणी, व्यापारी,उद्योजक,कष्टकरी, गृहिणी,विद्यार्थी,जेष्ठ नागरिक यांच्या जीवनात सुख समृध्दी शांती नांदावी अशी मनोभावे प्रार्थना केली.

# महाभारताची साक्ष देणारा वायगावचा सिद्धिविनायक

## पांडवांच्या पदस्पर्शाने पावन झालेले तिर्थक्षेत्र

**(संतोष शेंडे)**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०टाकरखेडा संभू**

भातकुली तालुक्यातील श्रीक्षेत्र वायगाव येथे महाभारतातील इतिहासाची साक्ष देणारी उजव्या सोंडेची अद्भुत गणेशमूर्ती पाहावयास मिळते. पांडव अज्ञातवासात असताना ते चिखलदरा येथे आले होते. परतीच्या वेळी याच मूर्तीचे दर्शन घेऊन पांडवांनी अज्ञातवास संपविला अशी आख्यायिका आहे.अशी पार्श्वभूमी लाभलेली गणेशमूर्ती सहाशे वर्षांपूर्वी खोदकामात सापडली.ती महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान आहे.

महाराष्ट्रात दोनच ठिकाणी सिद्धिविनायकाची ही मूर्ती पहावयास मिळते, मुंबईनंतर भातकुली तालुक्यात वायगाव येथे या सिध्दीविनायकाची मुर्ती आहे. अमरावती परतवाडा मार्गावर असलेल्या वायगाव येथील सिद्धिविनायकाचा इतिहास महाभारतातील विराट पर्वापर्यंत आहे. पांडवांनी याच मूर्तीचे दर्शन घेऊन अज्ञातवासाचा कालावधी संपविला होता. मध्ययुगीन काळात ही मुर्ती मूर्तीभंजक आक्रमकाच्या भयाने भूमिगत ठेवण्यात आली होती. गावाच्या सभोवताल असलेले अचलपूर,दारापूर,खोलापूर ही ठाणी असलेली गावे मुघलांच्या ताब्यात होती. त्यानंतर सहाशे वर्षाचा काळ लोटला. त्यामुळे मूर्तीचा अचूक ठावठिकाणा लागला नव्हता. लोकांना साक्षात्कार व्हायचा परंतु मूर्ती सापडत नव्हती.अचानक खोदकामात ही मूर्ती वायगाव येथे इंगोले यांच्या घरास सापडली. तो काळ सोळाव्या शतकातला होता. तेव्हापासून मूर्ती वाडारुपी मंदिरात प्रतिस्थापित करण्यात आली. कालांतराने गणेश भक्तांची गर्दी वाढू लागल्याने इंगोले कुटुंबाने भक्तांच्या सुविधांसाठी ट्रस्टची स्थापना केली. त्यानंतर येथे मंदिर बांधण्यात आले. त्यासाठी याच कुटुंबातील लोकांनी शेती दिली. याचे व्यवस्थापन लालजी पाटील,सितारामजी पाटील, तुळशीराम पाटील,शिवराम पाटील,तुकारामजी पाटील,श्रीराम पाटील व दयाराम पाटील यांच्याकडे आहे.ट्रस्टची धुरा अध्यक्ष म्हणून विलास तुकाराम इंगोले यांच्याकडे आहे.वर्षातून दोनदा येथे उत्सव साजरे होतात.भाद्रपद शुक्ल चतुर्थी ते पौर्णिमेपर्यंत गणेश उत्सवात दररोज दहा दिवस भक्तांना अन्नदान, ज्ञानदान, भजन, कीर्तन, काकडा, हरिपाठ होतो. पौर्णिमेला टाळ-मुदंग व नामघोषात पार्थिव मूर्तीचे विसर्जन होते. गणेश जयंती उत्सवात महाराष्ट्रातील हजारो भक्त येथे दाखल होतात.मध्य प्रदेशसह परराज्यातील भाविकही येथे भेट देतात.



**सिद्धिविनायक मूर्ती वैशिष्ट्य**

सिद्धिविनायक मूर्ती उजव्या सोंडेची आहे.उजव्या बाजूला सिद्धी व डाव्या बाजूला रिद्धी आहेत.एकदंत, पायावर पद्म, शंख चिन्हांकित आहे.हातातील माळ व मोदक ऐहिक जीवनातील समृद्धीचा संकेत देतात.उत्तरायण व दक्षिणायण होताना सूर्योदयाची पहिली किरणे मूर्तीवर पडतात.

# जावरे ज्वेलर्स च्या संचालकावर शस्त्रासह दरोडा टाकून लुटणारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ९ अमरावती**

शहरातील सराफ व्यावसायिक अरविंद उत्तमराव जावरे हे त्याचे वडीलासह दुचाकी वाहनाने त्याचे जावरे ज्वेलर्स नावाचे दूकानात दुकान उघडण्यासाठी गुरुवारी सकाळी ११/३० वा च्या दरंयान २५ किलो चांदीचे भांडे असणारा मुद्देमाल मुल्य २० लाख रू असणारी बॅग शस्त्राचा धाक दाखवून आठ इसमानी लुटून नेल्याची घटना घडली होती त्या घटनेचा तपास करीत गुन्हे शाखा युनिट कं. ०१ अमरावती शहर यांनी शस्त्रासह दरोडा टाकून लूटनारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद केली आहे.

पोलीस सूत्रांच्या मिळलेल्या माहितीनुसार फिर्यादी अरविंद उत्तमराव जावरे हे त्याचे वडीलासह दुचाकी वाहनाने त्याचे जावरे ज्वेलर्स नावाचे दूकानात दुकान उघडण्यासाठी सकाळी ११/३० वा च्या दरम्याण मातामाय मंदीर वंसुधरा कॉलनी येथून जात असताना त्याचे दुचाकी समोर आला व त्यानी त्याचे दूचाकी लाथ मारली त्याचां तोल नावून खाली पडले त्या दरम्यान साथीदारानी त्याला व त्याचे वडीलाना मारहाण करून तसेच बंदूक दाखवून त्याचे हातातील व्यामध्ये चांदीचे कंरडे, पायल, जोडवे असा एकंदरीत २५ किलो चांदीचे भांडे असणारा मुददेमाल मुल्य २० लाख रू असणारी बॅग शस्त्राचा धाक दाखवून



आठ इसमानी लुटून नेल्याबाबत तक्रार दिल्याने पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

गुन्हे शाखा युनिट कं. ०१ हे घटना घडल्यापासून निंरतन सातत्याने गुन्हा व आरोपीबाबत

तसेच आरोपीतानी गुन्हात वापरलेल्या गाडीबाबत माहीत काढत असताना आरोपी हे नागपूर ध्या दिशेने गोपनीय बातमीदार व तांत्रिक माहीतीवरून दिसून आल्याने मागील चार दिवसापासून नागपूर येथील गोधनी भागात सापाळ रचून बसले असता सोमवार रोजी गोंधनी भागात गुन्हातील आरोपीचे शरीरयष्ठी सारखा दिसणारा इसम दिसून आल्याने त्याला लागलीच ताब्यात घेवून त्याला त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्यानी त्याचे नाव गयासुददीन वहाजुददीन (कुरेशी) वय ४२ वर्ष त्याला गुन्हासंदर्भाने बारकाईने विचारपूस केली असता अमरावती येथे सोनाराला लूटल्याबाबत त्याने कबूल केले असून त्याचे इतर साथीदार हे उत्तर प्रदेशचे असल्याचे सांगीतले तसेच गुन्हातील मुददेमालाबाबत विचारणा केली असता सदर मुददेमाल विक्रीसाठी त्याने त्याचा ओळखीचा इसम नामे साजीद याचे कडे दिल्याचे सांगीतल्याने साजीद याचा शोध घेतला असता तो नागपूर येथील मानकापूर भागात मिळून आला.

मोहमद साजीक खॉन मोहमद हारून वय ३७ वर्ष व्यवसाय फेब्रीकेशन याच्या कडून सर्व माळ पोलिसांनी जप्त केला तर गुन्ह्यात वापरण्यात आलेली चार चाकी व दुचाकी वाहन हे चोरीचे वाहन असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

सदर गुन्हातील आरोपी पुढील तपाससंबधाने पोलीस स्टेशन गाडगेनगर यांचेकडे देण्यात आला आहे. सदर गुन्हाचा पुढील तपास गाडगेनगर पोलीस स्टेशन करत आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त, नवीनचन्द्र रेडडी, पोलीस उपआयुक्त कल्पना बारवकर मॅडम (मुख्यालय), पोलीस उपआयुक्त गणेश शिंदे सर. परिमंडळ कं. ०२, मा. पोलीस उपआयुक्त सागर पाटील सर, परिमंडळ कं. ०१, मा. सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) शिवाजी बचाटे सर, सहायक पोलीस आयुक्त अरून पाटील सर, गाडगे नगर विभाग यांचे मार्गदर्शना खाली युनिटकं. ०१ चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव, सपोनि मनीष वाकोडे, पोउपनि प्रकाश झोपाटे, फिरोज खॉन, सतिश देशमूख, अलीमउददीन खतीब नाईक पोलीस अमंलदार नाझिमउददीन सयैद, विकास गुडदे, पोलीस अमलदार सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक रोशन माहुरे, किशोर खेंगरे तसेच पोलीस स्टेशन सायबरचे पोलीस निरिक्षक पुनीत कुलट, सहायक पोलीस निरिक्षक अनिकेत कासार, नाईक पोलीस अमलदार पंकज गाडे यानी केलेली आहे.